



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# राजे रामराव महाविद्यालय, जत

NAAC Re-accredited with Grade 'B' (CGPA-2.50)

# रामविजय

२०१६–१७



## जल संवर्धन : काळाची गरज


आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार
...शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे


Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's
ICAMS
2016

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''

– शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# राजे रामराव महाविद्यालय, जत

जि.सांगली. (महाराष्ट्र)

| वार्षिक अंक | रामविजय | सन २०१६-१७ |
|---|---|---|

– संपादक मंडळ –

**प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर**

अध्यक्ष

**डॉ. श्रीकांत कोकरे**

संपादक

**- विभागीय संपादक -**

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी विभाग : | (वरिष्ठ) | .......................... | रमेश शिंदे |
| | (कनिष्ठ) | .......................... | दिनेश वसावे |
| हिंदी विभाग : | (वरिष्ठ) | .......................... | हिरामण टोंगारे |
| | (कनिष्ठ) | .......................... | आफताब खतीब |
| इंग्रजी विभाग : | (वरिष्ठ) | .......................... | रानोबा कारंडे |
| | (कनिष्ठ) | .......................... | बाबासाहेब पाटील (बेंडे) |
| जाहिरात विभाग : | .......................................... | | मल्लाप्पा सज्जन |

* मुद्रक : सप्तक प्रिंटींग सर्व्हिसेस, कोल्हापूर. *

## संस्थेची प्रार्थना

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।
राम कृष्ण रहीम ख्रिस्त
बुद्ध झरतुष्ट्र।
महावीर मानव संत मानव्यांचे दीपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदुया चरण ।
सत्य, शील, प्रामाणिकता,
त्याग, पिळवणुकीस आळा,
मानव्याचे अधिष्ठान ईशतत्व दर्शन।
यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणात ।।

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

अग्ने नय सुपथा राये आस्मान्
विश्वानि देव वयुनानि विद्वान ।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते न उक्तिं विधेम ।।

– ईशावास्योपनिषद्

## प्रकाशन व मालकी संबंधी माहिती फार्म नं. ४ उपविधी नं. ८ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | **राजे रामराव महाविद्यालय, जत** |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| प्रकाशक | : | **प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर** |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | राजे रामराव महाविद्यालय, जत (ता. जत, जि. सांगली) |
| संपादक | : | **डॉ. श्रीकांत राजाराम कोकरे** |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | राजे रामराव महाविद्यालय, जत (ता. जत, जि. सांगली) |
| मुद्रक | : | **सप्तक प्रिंटींग सर्व्हिसेस, कोल्हापूर** |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | राजारामपुरी ९ वी गल्ली, ओमेगा टॉवर २ रा मजला, कोल्हापूर. दूरध्वनी : ०२३१-२५२२८२८ |

मी **प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर** जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरी आहे.

स्थळ : जत

**प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर**
प्रकाशक

सर्व विभागीय संपादकांनी ज्या त्या विभागातील लेखनाची निवड, संपादन आणि मुद्रित शोधन केले आहे. या अंकातील लेख, कथा, कविता इत्यादी साहित्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।



शिक्षण महर्षी **डॉ. बापूजी साळुंखे**

**संकल्पक संस्थापक 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था', कोल्हापूर**

जन्म - ९ जून १९१९

महानिर्वाण - ८ ऑगस्ट १९८७

## ‘संस्थामाता’



# श्रीमती सुशीलादेवी गोविंदराव साळुंखे

जन्म : ४ सप्टेंबर १९२७ महानिर्वाण : २२ ऑक्टोबर २०१३

# जाणता राजा



**कै. श्रीमंत रामरावराजे डफळे**

संस्थानाधिपती, जत

# आमचे आश्रयदाते



कै. श्रीमंत विजयसिंहराजे डफळे

# संस्था पदाधिकारी



अध्यक्ष

**मा. ना. चंद्रकांत (दादा) पाटील**

महसूल, मदत आणि पुनर्वसन,
सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य



कार्याध्यक्ष

**मा. प्राचार्य अभयकुमार गो. साळुंखे**



उपाध्यक्ष

**मा. संपतराव रा. जेधे**



उपाध्यक्ष

**मा. रघुनाथ मनोहर शेटे**

# संस्था पदाधिकारी



सचिव

**मा. प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे**



कार्याध्यक्ष

**मा. डॉ. पुंडलिक म. काळभोर**



सहसचिव-प्रशासन

**मा. प्राचार्य डॉ. अशोक कारंडे**



सहसचिव-अर्थ

**मा. पुंडलिक शा.चव्हाण**

# महाविद्यालयाचे कुशल नेतृत्व



**प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर**
एम्.ए.,एम्.एड्.,पीजीडीटीई.,एम्.फिल.,पीएच्.डी.
अध्यक्ष, संपादक मंडळ



**डॉ. श्रीकांत कोकरे**
संपादक



**रमेश शिंदे**
विभागीय संपादक मराठी (वरिष्ठ)



**हिरामण टोंगारे**
विभागीय संपादक हिंदी (वरिष्ठ)



**रानोबा कारंडे**
विभागीय संपादक इंग्रजी (वरिष्ठ)



**बाबासाहेब पाटील (बेंडे)**
विभागीय संपादक इंग्रजी (कनिष्ठ)



**दिनेश वसावे**
विभागीय संपादक मराठी (कनिष्ठ)



**आफताब खतीब**
विभागीय संपादक हिंदी (कनिष्ठ)



**मल्लाप्पा सज्जन**
जाहिरात प्रमुख

# गुणवंत विद्यार्थी

## Student of the Year 2016-17

### कला शाखा



**जास्वंदी व्हनखंडे**
B.A. III (English)

### वाणिज्य शाखा



**जबिना शेख**
B.Com. III

### विज्ञान शाखा



**रोहिणी शिंदे**
B.Sc. III (Physics)



**श्रुतिका क्षिरसागर**
वनस्पती शास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ आयोजित
विज्ञान रांगोळी स्पर्धेत प्रथम



**सुस्मिता कांचनकोटी**
महसूल विभाग जत आयोजित
रांगोळी स्पर्धेत प्रथम



**पुजा कोळी**
वनस्पती शास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ आयोजित
विज्ञान निबंध स्पर्धेत द्वितीय



**दिपाली माने**
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व
स्पर्धेत द्वितीय



**मनोज जिगजीनी**
विद्यापीठ पातळीवरील विज्ञान
पोस्टर स्पर्धेत प्रथम



**शिवाजी शिंदे**



**रोहिणी शिंदे**

Selection for a special traning conducted by
N.C.E.R.T, Mysore under PTTS-2016



**भाग्यश्री माळी**
गणित प्रश्न मंजुषेत प्रथम



**अश्विनी कोळी**



**रुपाली मठपती**



**श्रध्दा लोणी**



**सुनिता जाधव**



**सुरेखा सावंत**

रामविजय २०१५-१६ तील लेखनास शिवाजी विद्यापीठाचा पुरस्कार



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या आजीव सेवकपदी नियुक्ति झाल्याबद्दल प्राचार्य डॉ.एस्.वाय्. होनगेकर यांचा सत्कार



शिवाजी विद्यापीठाची पी.एच.डी. ही पदवी मिळविल्याबद्दल डॉ. आर. ए. लवटे यांचा सत्कार



शिवाजी विद्यापीठाची पी.एच.डी. ही पदवी मिळविल्याबद्दल डॉ. सोमनाथ काळे यांचा सत्कार



लिंडाऊ (जर्मनी) येथे नोबेल लॉरेट मिटसाठी निवड झालेबद्दल डॉ. संजय लट्ठे यांचा सत्कार



नांदेड विद्यापीठाची पी.एच.डी. ही पदवी मिळविल्याबद्दल डॉ. बी. एम. डहाळके यांचा सत्कार



एन.सी.सी. चे प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल लेफ्टनंट पी.ए.सावंत यांचा सत्कार



जे.एन.टी. विद्यापीठाची पी.एच.डी. ही पदवी मिळविल्याबद्दल डॉ. पी. बी. अभंगे यांचा सत्कार



संस्था स्तरीय निबंध स्पर्धेतील यशाबाबत सौ. निर्मला मोरे यांचा सत्कार

# भावपूर्ण श्रध्दांजली...





**डॉ. के. बी. पवार** **डॉ. डी. एन. धनागरे**

**माजी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे माजी सचिव गजेंद्र ऐनापूरे, आजीव सभासद नारायण जाधव, बाजीराव सुर्यवंशी, आजीव सेवक मानसिंगराव जगताप, अभिमन्यु लोंढे, सामान्य सभासद रामचंद्र पाटील, शिवलींग आजमान, प्रा. शिवाजी चव्हाण यांचे बंधू लक्ष्मण चव्हाण, प्रा. प्रकाश जाधव यांच्या मातोश्री आक्काताई जाधव, रामविजय २०१५-१६ चे संपादक प्रा. सिध्दारूढ ऐवळे यांचे पिताश्री भिमाण्णा ऐवळे, पत्रकार गोविंद तळवकर, गायिका किशोरी अमोणकर यांच्यासह वार्षिक अंक सालात थोर नेते, आजी माजी मंत्री, जवान, उद्योजक, साहित्यिक, कलाकार, शास्त्रज्ञ, खेळाडू, सामाजिक कार्यकर्ते व हितचिंतक दिवंगत झाले त्यांनी भावपूर्ण श्रध्दांजली...

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर


### व्यवस्थापक मंडळ

**सन २०१५-२०१८**

| | |
|---|---|
| मा. ना. चंद्रकांत (दादा) बच्चु पाटील | अध्यक्ष |
| मा. रघुनाथ मनोहर शेटे | उपाध्यक्ष |
| मा. संपतराव रामचंद्र जेधे | उपाध्यक्ष |
| मा. प्राचार्य अभयकुमार गोविंदराव साळुंखे | कार्याध्यक्ष |
| मा. डॉ. पुंडलिक नामदेव काळभोर | कार्याध्यक्ष |
| मा. प्राचार्य सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | सेक्रेटरी |
| मा. प्राचार्य डॉ. अशोक आबा कारंडे | सहसचिव प्रशासन |
| मा. प्राचार्य पुंडलिक शामराव चव्हाण | सहसचिव अर्थ |
| मा. रविंद्र रामचंद्र चव्हाण | सदस्य |
| मा. अविनाश दिनकर पाटील | सदस्य |
| मा. संपत बंडू मोरे | सदस्य |
| मा. सदाशिव कृष्णा कुंभार | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र विश्वनाथ शेजवळ | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. युवराज अंबादास भोसले | सदस्य |
| मा. सिताराम महारु गवळी | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. हिंदुराव बाबुराव पाटील | सदस्य |
| मा. श्रीराम शरदचंद्र साळुंखे | सदस्य |
| मा. अविनाश नामदेव कदम | सदस्य |
| मा. कृष्णा गणपती बिसले | सदस्य |

### आजीव सेवक समिती

| | |
|---|---|
| १) मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र विश्वनाथ शेजवळ | अध्यक्ष |
| २) मा. पुंडलिक शामराव चव्हाण | सेक्रेटरी |
| ३) मा. प्राचार्य सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | सदस्या |
| ४) मा. प्राचार्य डॉ. अशोक आबा कारंडे | सदस्य |
| ५) मा. प्राचार्य डॉ. युवराज अंबादास भोसले | सदस्य |
| ६) मा. सिताराम महारु गवळी | सदस्य |
| ७) मा. भाऊसाहेब नानासाहेब सांगळे | सदस्य |
| ८) मा. हिंदुराव बाबूराव पाटील | सदस्य |
| ९) मा. कृष्णा गणपती बिसले | सदस्य |
| १०) मा. मारुती निवृत्ती सोनवणे | सदस्य |
| ११) मा. अशोक विठोबा रामुगडे | सदस्य |
| १२) मा. संभाजीराव बाळकृष्ण पाटील | सदस्य |
| १३) मा. प्रकाश शंकर टेके | सदस्य |
| १४) मा. सखाराम सत्याप्पा कांबळे | सदस्य |
| १५) मा. बाळासाहेब निवृती माळी | सदस्य |
| १६) मा. डॉ. सिताराम यल्लुप्पा होनगेकर | सदस्य |
| १७) मा. शशिकांत यशवंत काटे | सदस्य |

### विश्वस्त मंडळ : सन २०१५-२०१८

| | |
|---|---|
| मा. संपतराव रामचंद्र जेधे | कार्याध्यक्ष |
| मा. प्राचार्य सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | सचिव |
| मा. पुंडलिक शामराव चव्हाण | सहसचिव अर्थ |

# प्राचार्यांचे मनोगत...



**प्राचार्य डॉ. एस्. वाय. होनगेकर**

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'' हा ध्यास उराशी कवटाळून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्राच्या १२ व कर्नाटकातील बेळगांव जिल्ह्यातील दुर्गम खेडी व वाड्यावस्त्यांवरील गोरगरीब व शिक्षणापासून वंचित मुलां-मुलींसाठी भटकंती करून शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी पोहचवण्यासाठी आपले उभे आयुष्य खर्ची घातले. जत सारख्या दुर्गम व दुष्काळी भागात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाली पाहिजे. ही पूज्य बापूजींची तळमळ आणि जत संस्थानचे भूतपूर्व नरेश श्रीमंत विजयसिंहराजे डफळे यांच्या उदार दातृत्वातून १५ जून १९६९ रोजी राजे रामराव महाविद्यालयाची स्थापना झाली. श्रीमंत विजयसिंहराजे डफळे यांच्या दातृत्वामुळे महाविद्यालयास २३ एकर एवढ्या विस्तीर्ण जागेचा परिसर लाभला आणि महाविद्यालयाने प्रगतीची घोडदौड सुरू केली. गेल्या ४८ वर्षात महाविद्यालयाने अनेक विद्यार्थी घडविले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकणारे खेळाडू निर्माण केले. विद्यार्थ्यांच्या कार्यकर्तृत्वाने महाविद्यालयाची पताका देश-विदेशात डौलाने फडकत आहे.

राजे रामराव महाविद्यालय हे मोठ्या शहरापासून दूर व ग्रामीण तसेच दुष्काळी भागातील महाविद्यालय. मोठ्या शहरात असणारा चंगळवाद आणि वागण्यातला स्वैराचार यापासून इथले विद्यार्थी तसे दूर आहेत. विद्यार्थ्यांत असणारा प्रामाणिकपणा व त्यांची नम्रता ही या महाविद्यालयाची मोठी ताकद आहे. इथले सर्व वर्ग विद्यार्थ्यांनी खचाखच भरलेले असतात. या संधीचा उपयोग आम्ही सर्व गुरुदेव कार्यकर्ते विद्यार्थ्यांना बापूजींना अपेक्षित असलेले सुसंस्कारित सक्षम नागरिक घडविण्यासाठी करीत आहोत. वेळकाळाचे भान न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विद्यार्थी केंद्रित अनेक उपक्रम राबवत आहोत. बापूजींचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष जगत असलेले आम्हा सर्वांचे मार्गदर्शक व कुटुंबप्रमुख संस्थेचे कार्याध्यक्ष आदरणीय प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या कारकिर्दीची सुरुवात येथूनच झाल्याने त्यांचे या महाविद्यालयाकडे बारकाईने लक्ष असते. एक कुशल प्रशासक म्हणून संस्थेला लाभलेले त्यांचे खंबीर नेतृत्व व संस्थेच्या सचिवा मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन यामुळे या महाविद्यालयाची वाटचाल अधिकाधिक प्रगतीच्या दिशेने सुरू आहे.

संस्था पदाधिकाऱ्यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन व आम्हा गुरुदेव कार्यकर्त्यांची मेहनत यातून या महाविद्यालयाने या शैक्षणिक वर्षात अनेक यशोशिखरे पादाक्रांत केली आहेत. विज्ञान शाखेतील विद्यापीठाच्या सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्त्या मिळवून विद्यापीठाच्या तीन जिल्ह्यातील सर्व ग्रामीण महाविद्यालयांमधून हे महाविद्यालय विद्यापीठात सर्वप्रथम आले. त्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन मा. प्राचार्यांचा उचित गौरव करण्यात आला याचा आम्हा सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना सार्थ अभिमान आहे. भारत सरकारच्या एन. सी. ई. आर. टी. या संस्थेमार्फत दरवर्षी भौतिकशास्त्र विषयातील बी. एस. सी. पदवी शिक्षण घेणाऱ्या देशभरातील विद्यार्थ्यामधून गुणवत्तेच्या आधारावर फक्त ५० विद्यार्थ्यांची निवड करून भारत सरकारच्या वतीने १५ दिवसाचे खास प्रशिक्षण दिले जाते. देशभरातून निवडलेल्या ५० विद्यार्थ्यांमध्ये या महाविद्यालयाच्या कु. रोहिणी शिंदे व श्री शिवाजी शिंदे या दोघांचा समावेश होता हे नमूद करताना आनंदाने ऊर भरून येतो. मागील वर्षीच्या 'रामविजय' अंकातील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या एकूण पाच लेखांना विद्यापीठाने रोख पारितोषिके देऊन गौरविले आहे. एकाच वर्षात पाच विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळवून नवा इतिहास निर्माण केला आहे. विद्यापीठाने आयोजित केलेला युवक महोत्सव व आविष्कार या संशोधन महोत्सवामध्येही अनुक्रमे कु. दीपाली माने व कु. सरिता नरळे या विद्यार्थिनींनी बक्षिसे मिळवलेली आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या २ कोटी वृक्षलागवड उपक्रमात सहभागी होऊन महाविद्यालयाने यावर्षी ४०० झाडे लावली व सर्व प्राध्यापकांनी स्वत:च्या खिशातून वर्गणी काढून झाडे जगविण्यासाठी ठिबक सिंचनाची सोय करून सर्वच्या सर्व

४०० झाडे उत्तम रितीने जोपासली आहेत. येत्या जून महिन्यात अजून ४०० झाडे लावून जगविण्याचे नियोजन केले आहे. महाविद्यालयाच्या २३ एकराच्या परिसरातील वाहून जाणारे पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविण्यासाठी विद्यापीठाच्या खास परवानगीने यावर्षीचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबिर महाविद्यालयात घेऊन जलसंधारणासाठी बंधारा बांधण्याचे भरीव व शाश्वत काम विद्यार्थ्यांनी केले आहे. शासकीय योजनेतून असा बंधारा बांधण्यासाठी किमान १० लाख रुपये खर्च आला असता परंतु विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून हे भरीव काम पूर्ण केले आहे.

यु.जी.सी. च्या अनुदानातून सुरू असलेल्या इनडोअर गेम हॉलचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, गणित व भौतिकशास्त्र विभागांच्या नवीन प्रयोगशाळांचे सुमारे १४ हजार स्क्वेअर फुटाचे बांधकाम पूर्णत्वास आले आह.

पूज्य बापूजींचे तत्वज्ञान उराशी कवटाळून आम्ही गुरुदेव कार्यकर्त्यांनी सामाजिक दायित्व जोपासले आहे. या वर्षी जत व कवठेमहांकाळ तालुक्यातील माध्यमिक शाळांच्या १२५ मुख्याध्यापकांसाठी ‘प्रभावी प्रशासन व शालेय विकास’ या विषयावर रविवारी सुट्टीच्या दिवशी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. पथनाट्याच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी स्वच्छ-भारत, हागणदारीमुक्त गांव, निर्भया अभियान, हुंडाबळी महिला सबलीकरण आदि विषयांवर जत शहर व परिसरात अनेक पथनाट्यांचे सादरीकरण करून समाजप्रबोधनाचे मोठे कार्य केले आहे. हे नमूद करताना विशेष आनंद होतो. मागील वर्षाप्रमाणेच याही वर्षी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त रविवारी सुट्टीच्या दिवशी कॉलेज भरवून त्यांना अनोखी श्रद्धांजली वाहण्याचा उपक्रम राबविला व दरवर्षी अशा प्रकारे सुट्टीच्या दिवशी जादा काम करून डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलामांना आदरांजली वाहण्याचा निर्धार केला आहे.

या शैक्षणिक वर्षात भौतिकशास्त्र विषयातील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले ज्यात २४७ इतक्या विक्रमी संख्येने महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठातून प्राध्यापक सहभागी झाले. या परिषदेस सहा जपानी शास्त्रज्ञांनी उपस्थित राहून परिषदेत मार्गदर्शन केले. यांच परिषदेत संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या उपस्थितीत जपानच्या टोकियो विद्यापीठाशी महाविद्यालयाने सामंजस्य करार केला. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. त्याचबरोबर विद्यापीठीय स्तरावरील गणित विषयाच्या एकदिवसीय कार्यशाळेचे व ‘सौंदर्यविषयक कौशल्ये’ या विषयावर केवळ मुलींसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक तसेच क्रीडा क्षेत्रांतील विकासाबरोबरच त्यांच्यात सूप्तरूपाने असणाऱ्या सृजनशील प्रतिभेला वाव मिळावा म्हणून महाविद्यालय दरवर्षी ‘रामविजय’ वार्षिक अंकाचे प्रकाशन करते. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला वाट करून देणारे हे एक उत्तम माध्यम आहे. विद्यार्थी आपल्या प्रतिभेतून मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील विविध प्रकारचे वैचारिक लेख, कथा व कविता ‘रामविजय’च्या माध्यमातून प्रकाशित करतात. या अंकातील त्यांचे लिखाण त्यांच्यासाठी एक अविस्मरणीय ठेवा असतो. महाविद्यालयाच्या वर्षभरातील विविध उपक्रमांचा समावेश या अंकात होत असल्याने हा अंक म्हणजे महाविद्यालयाचा आरसा आहे. असा हा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चा अंक वाचकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. या अंकातील विद्यार्थ्यांचे लिखाण, त्यांच्या भविष्यकाळातील लिखाणांची नांदी आहे. या लिखाणातून त्यांना मिळणारी ऊर्जा त्यांची प्रतिभा अधिक उजळून टाकेल, याचा मला विश्वास आहे. त्यांच्या भावी वाटचालीस महाविद्यालयाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. एस्. वाय. होनगेकर**
प्राचार्य

# संपादकीय...

एका संस्कृत शिकवणाऱ्या सुसंस्कृत महामानवाने १९५४ मध्ये लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. राजसत्ता वा धनसत्ता हाताशी नसतानाही सर्वसामान्यांच्या आधाराने उभारलेले 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' नावाचे ज्ञानादानाचे केंद्र दलितमित्र शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे तत्वज्ञान अवघ्या महाराष्ट्रासह कर्नाटकाला देत आहे. या वटवृक्षाला असणारी राजे रामराव महाविद्यालय ही एक फांदी आणि या फांदीवर दर वर्षीच्या वसंतात बहरणारे 'रामविजय' नावाचे रानफुल. या रानफुलात सुगंध भरणारी महाविद्यालयाची तरुणाई, त्यांना प्रोत्साहन देणारी सहकारी आणि सर्वांचे नेतृत्त्व करणारे प्राचार्य यांच्या वतीने या वर्षाचा 'रामविजय' आपल्या हाती देताना अभिमानाने उर भरुन येतो आहे.

अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा मानल्या जातात. मानवाच्या गरजांचा विचार करावयाचा झाल्यास त्या शारीरिक आणि मानसिक पातळीवरच्या गरजा या दोन विभागात पाहता येतील. वर उल्लेख केलेल्या गरजा या शारीरिक तथा जीवना च्या बाह्यांगाला उपयुक्त असणाऱ्या आहेत. मानसिक पातळीवरच्या गरजांचा विचार केल्यास हे सहज लक्षात येईल की व्यक्त होणे ही सुद्धा तितकीच नैसर्गिक आणि आवश्यक गरज आहे. वस्त्र ही बाब निवारा म्हणूनच पाहिली तर बाह्यांगाला उपयुक्त असणाऱ्या गरजा जशा मानवाला मूलभूत वाटतात तशा त्या निसर्गातल्या इतर पशूपक्षांनाही मूलभूतच असतात. मग प्रश्न पडतो व्यक्त होण्याची गरज पशू-पक्ष्यांना वाटत नाही मात्र ती माणसालाच का वाटते?

या प्रश्नांचे उत्तर शोधताना आपणास सजीवांच्या उत्क्रांतीचा आढावा घ्यावा लागेल. या पृथ्वीवर पशु आणि पक्षी निर्माण होऊन सुमारे ३ (तीन) कोटी वर्षे झाली आहेत. मानवाच्या निर्मितीला केवळ पाच लाख वर्षाचा इतिहास आहे. आता मला सांगा, तीन कोटी वर्षापूर्वी पृथ्वीवर आलेला वाघ (पशु) या पृथ्वीचा मालक की पाच लाख वर्षापूर्वी आलेला माणूस या पृथ्वीचा मालक? वाघ हाच पृथ्वीचा मालक असायला हवा असा तर्क अनेकजण काढतील पण वास्तव पाहिल्यास वाघाला पिंजऱ्यात बंद करून पृथ्वीवर राज्य करणारा मानव दिसून येतो.

माणसाला हे का बरे शक्य झाले? ते शक्य झाले विचाराच्या जोरावर. सायंकाळचे अन्न प्राशन करून आकाशात लुकलुकणाऱ्या चांदण्याकडे पाहणारा वाघ आणि माणूस यांच्यात एक फरक आहे तो म्हणजे वाघाने चांदण्या का लुकलुकतात याचा विचार केला नाही पण मानवाने लुकलुकणाऱ्या चांदण्याचा शोध घेतला. त्या मागच्या कार्यकारणभावाची चर्चा केली. यातूनच त्याच्या मेंदूचा विकास होत गेला आणि आज शरीराच्या विकासाइतकाच नव्हे तर किंबहुना अधिकच मेंदूच्या विकासाला महत्व प्राप्त झाले आहे. यातूनच मानवाला व्यक्त होण्याची सवय लागली. व्यक्त होत असताना भाव-भावनांचा आविष्कार घडत गेला. पुढे त्याला सुखदुःखाच्या, चांगल्या वाईटाच्या संकल्पनांना सामोरे जावे लागले. व्यक्त होण्यातला हर्ष त्याला सुखावह आणि हवाहवासा वाटू लागला. व्यक्त होणाऱ्या स्मृती मानवाच्या हृदयाला हळूवारपणे साद घालू लागल्या. त्यातूनच मग त्याला स्मृती जपण्याची गरज भासू लागली. गरज ही शोधाची खरी जननी असते असे मानतात. या गरजेपोटीच लिपी आणि लेखनाची सुरुवात झाली. ती विकसित झाली. भौतिकी साधनाच्या साहाय्याने विकसित झालेली लिपी आणि लेखन यांचे आज आभासी लिपी आणि लेखन कलेत अवतरली आहे. तिचा वापर आणि उपयोजन नवी पिढी अत्यंत सहजगत्या करते आहे. कदाचित याच बदलाचे भाव व्यक्त करण्यासाठी कवी म्हणत असेल, 'जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळून किंवा पुरुनी टाका.''

अशा या कायम नव्या आणि नाविन्याच्या शोधात असणाऱ्या तरूणांच्या भाव-भावनांना वाट मोकळी करून देण्याचं एक महत्वाचं कार्य महाविद्यालय करत असतं. कधी वर्गातून तर कधी वर्गाबाहेरही. कधी औपचारिक समारंभातून तर कधी अनौपचारिक गप्पा-गोष्टींतून. या सर्वांचा एक समर्थ धांडोळा घेण्याचे कार्य करत असते त्या महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक. होय, राजे रामराव महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक म्हणजे 'रामविजय'. सुवर्णमहोत्सवाच्या उंबरठ्यावर उभे असणारे हे महाविद्यालय जतकरांच्या घराघरात आणि मना-मनात पोहचविण्यासाठी दरवर्षी 'रामविजय' नवीनवी आयामे घेऊन येत असतो. याहीवर्षी तो एका आगळ्या-वेगळ्या स्वरुपात आपणाकडे देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

कोणत्याही मुद्रित अंकाला जर मर्यादा कशाची असेल ती पानांच्या संख्येची. केवळ मर्यादित पानांमुळे अनेक तरूण मित्र-मैत्रिणींच्या साहित्यकृतींचा समावेश या अंकात होऊ शकला नाही. अशा सर्व तरुण-तरुणींना एकच सल्ला की लिहित राहा. प्रसिद्धीसाठी नको तर मनस्वास्थ्यासाठी लिहा. प्रसिद्धीसाठी लिहाल तर कदाचित हराल पण आनंदासाठी लिहित राहाल तर प्रसिद्धी तुमची कधीच पाठ सोडणार नाही. ती आपोआपच तुम्हाला शोधत राहिल.

शेवटी या वर्षाच्या 'रामविजय' ला पूर्णत्व आणण्यासाठी संपादक मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे नेतृत्व, विभागीय संपादकांचे कर्तृत्व, जाहिरात प्रमुखाचे कसब आणि सप्तक प्रिंटिंग सर्व्हिसेसच्या टिमचे कार्य कौशल्य पणाला लागले आहे. बाकी माझ्याबाबत मी इतकंच म्हणेन की,

**''फोडिले भांडार, धन्याचा हा माल,**
**मी तो हमाल, भार वाही!!''**

*गुढीपाडवा* — *दिनांक २८ मार्च २०१७*

# Staff List (Senior Wing)

**Department of English**
- Dr. Hongekar S. Y. (Principal)
- Shri. Karande Ranoba Dnyanoba
- Sou. Patil Prabha Arvind
- Shri Bansode Ramdas Shamrao
- Shri. Sannake Tukaram

**Department of Marathi**
- Shri.Shinde Ramesh Jayuram
- Sou.More Nirmala Vasantrao

**Department of Hindi**
- Shri.Tongare Hiraman Devram
- Dr. Nagre Savita Bhaulal

**Department of History**
- Shri.Kumbhar Dharmaraj Sharnappa
- Shri Choudhari Pundalik Jaypal

**Department of Political Science**
- Dr. Dahalke Bhimashankar M.
- Miss. Farakate Samiksha Annaso

**Department of Physical Education**
- Shri.Chavan Sidraya Sukhadev

**Physical Director**
- Shri.Chavan Vijay Ganpatrao

**Department of Economics**
- Dr. Loharkar Sambhaji Narsingrao
- Dr. Kale Somnath Vishnu
- Miss. Uthale Jayamala Arjun

**Department of Geography**
- Shri.Chavan Shivaji Damodar
- Shri.Shinde Anil Trimbakrao
- Shri.Patil Ramchandra Bhimrao

**Commerce Faculty**
- Shri. Herwade Ashok Rachgonda
- Shri Borate Santosh Dashrath

**Department of Physics**
- Dr.Kokare Shrikant Rajram
- Dr.Bhosale Appasaheb Kundlik
- Dr. Latthe Sanjay Subhash
- Dr. Abhenge Parshuram Baburao
- Dr. Gurav Annaso
- Mr. Sutar Rajaram S.
- Miss. Dipali Chougule
- Mr. Ankalgi Mayur
- Mr. Dalwai Sanjeev

**Department of Chemistry**
- Shri Rangar Krishna Kondiba
- Dr. Kulal Shivaji Rauba
- Shri Salunke Govind Devidas
- Shri Kumbhar Deepak Ananda
- Mr. Khogare Balaji Trimbak
- Mr. Kokare Arjun Namdeo
- Miss. Mali Vidya Chandrashekar
- Miss. Bobade Nikita Ramdas

**Department of Mathamatics**
- Shri. Sutar Sagar Tanaji
- Miss. Savita Gejji

**Department of Zoology**
- Shri.Karennawar Mahadeo Huchappa
- Shri Sajjan Mallappa Bhimappa
- Dr. Jadhav Vijay Shankar
- Miss. Deshmukh Sangeeta
- Miss. Ankalgi Priyanka

**Department of Botany**
- Dr. Sathe Sanjay Sadashiv
- Dr. Lavate Rajendra Ananda

**Department of Statistics**
- Shri.Dharigauda Suresh Parappa
- Miss. Patil Snehal G

**B.C.A.**
- Miss.Balekai Jayshir Irgond
- Shri. Mali Prakash Datta
- Shri. Mulani J A
- Shri.Mali Shivanand Gurulinga
- Shri. Mali Amol Tulsiram
- Shri. Kumbhar Umesh S.

**Librarian**
- Mr. Patil Abhay

# Staff List (Junior Wing)

**Department of English**
- Shri Patil Babasaheb Bhagvantrao
- Shri. Javanjal Namdev Abasaheb
- Shri. Shaikh Suvel

**Department of Marathi**
- Shri. Mane Bhanudas Laxman
- Shri. Vasave Dinesh Chandrasing
- Shri. Ingale Kumar

**Department of Commerce**
- Kum. Jyotsana Shekar Bhosale

**Department of Hindi**
- Shri. Khatib Afatab Nasaruddin

**Department of History**
- Shri. Dadas Satish Laxman

**Department of Political Science**
- Shri. Jadhav Manoj Arun

**Department of Economics**
- Miss. Mote Jayashree

**Department of Environment**
- Kum. Gitanjali Chavan

**Physics**
- Shri. Shaikh Sameer Abdulkayyum
- Shri. Bamane Suresh Maruti
- Miss. Narale Triveni Laxman

**Department of Chemistry**
- Shri. Dhangond Kadappa Malkappa
- Shri. Sawant Pandurang Appasaheb
- Kum. Pawar Priyanka Ramesh

**Department of Mathematics**
- Shri. Jatti Basavraj

**Department of Biology**
- Shri. Teli Ashok Dhanappa
- Smt. Karape Archana Bapurao
- Kum. Saptal Lalita Pandurang

**Department of IT**
- Shri. Jadhav Prakash Appa

**Department of Sociology**
- Shri. Kesarkar Dattatrya Annappa

# Staff List (Non Teaching)

**Office Superintendent**
- Shri Dargude Shrirang Prabhu

**Head Clerk**
- Shri. Patil Meghsham Krishna

**Senior Clerk**
- Shri Shinde Ramchandra Shivaji

**Junior Clerk**
- Shri. Nalwade Suhas Sampatrao
- Shri Chavan Kacheshwar Uttamrao

**Laboratory Assistant**
- Shri. Pujari Suresh
- Shri.Pujari Birappa Kenchappa

**Library Clerk**
- Shri Moin Shivram Bhausaheb

**Laboratory Attendant**
- Shri. Kolekar Mhalappa Dnyanu
- Shri.Chavan Maruti Dhondiram
- Srhi. Hegade Gorkhnath Madappa
- Shri.Khude Namdev Tukaram
- Shri.Shingade Tukaram Ananda
- Shri.Imbade Rajkumar Nanasaheb
- Shri. Shirgire Abaso Babu

**Library Attendant**
- Shri. Talekar Sarjerao Vithal
- Shri.Sadakale Jalindar Martand
- Shri. Salunkhe Satish Yashwant

**Peon**
- Shri. Ghugare Adhik Maryappa
- Shri.Hrimath Mallaikajun Durdundayya

# क्रिडा विभाग: गुणवंत खेळाडू (वरिष्ठ)



**आदेश जाधव**
टी-२०
श्रीलंका क्रिकेट



**श्री. सागर पांढरे**
आंतर महा.
१५०० मी. द्वितीय
शिवाजी विद्यापीठ



**श्री. मिलिंद माने**
Taekwondo
National Player



**रवि कुकडे**
बी. ए. भाग २
Taekwondo
National Player



**रोशन कांबळे**
बी. ए. भाग १
Taekwondo
National Player



**अभिनंदन माळी**
अर्धमॅरेथॉन खेळाडू



**कु. जयश्री सकट**
बी. ए. भाग २
४x४ रिले



**कु. राणी खरात**
बी. ए. भाग १
४x४ रिले



**कु. अनिता ऐडगे**
बी. ए. भाग ३
४x४ रिले



**कु. सुप्रिया कदम**
बी. ए. भाग ३
४x४ रिले



**खो-खो मुली (सांघिक) तृतीय**

# क्रिडा विभाग: गुणवंत खेळाडू (कनिष्ठ)



**प्रविण वाकसे**
जीत कुने दो



**अमित ढोळी**
जीत कुने दो



**पृथ्वीराज वाघमारे**
जीत कुने दो



**सुशांत शेजुळ**
५० किलो कुस्ती



**मिरासाब जातकर**
४०० मी. हर्डल्स



**जोतीराम गोयकर**
५०० मी. धावणे




# International Conference on Advances in Materials Sciences





CHANGING PA
RAJE RAMRAO MA
ICSSR-SPONSORED
CHANGING PARADIGM
17 February, 2017 Time: 11:50 am

# गणित विभाग परिषद



राजे रामराव महाविद्यालय,जत
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,Kolh
Raje Ramrao Mahavidyalay
24th Annual Conference of SUMS
on
T TRENDS IN MATHEMATICS AND STUD
18th March, 2017
ponsored by - Shivaji University, Kolh
and
versity Mathematics Society (SUMS
ganized by - DEPARTMENT OF MATHEMATICS,
Raje Ramrao Mahavidyalaya,Jath
NATIONAL MATHEMATICS DAY
22-DEC-2015
Department Of Mathematics
Mahavidyalaya,Jath
RECENT




निर्भया अभियानांतर्गत पोलिस सायकल रॅली




सौंदर्य शास्त्र प्रशिक्षण





## परंपरेचे पाईक आम्ही...









## जलसंवर्धनासाठी बंधारा










# वार्षिक क्रिडा दिन
















वृक्षी वल्ली आम्हा सोयरे, वनचरे...




माजी विद्यार्थी मेळावा

# मराठी विभाग वरिष्ठ

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | विद्यार्थ्याचे नांव | पान नं. |
|---|---|---|---|
| १ | गावाकडच्या गोष्टी... (ललीत) | सविता आण्णाप्पा बिराजदार, बी. एस्सी भाग – ३ | ७ |
| २ | शेतकरी (कविता) | कु. राणी नाईक, बी. एस्सी. भाग – ३ | ८ |
| ३ | अन्नदाता (कविता) | कु. रोहिदास अभंगे, बी. ए. भाग – २ | ८ |
| ४ | नोटाबंदी (मुलाखत) | चैतन्या बिरादार, बी. ए. भाग – २ | ९ |
| ५ | विसरलो (कविता) | कु. राणी नाईक, बी. एस्सी. भाग – ३ | १० |
| ६ | वृद्धाश्रम (वैचारिक) | चैतन्या बिरादार, बी. ए. भाग – २ | ११ |
| ७ | ग्रंथ हेच गुरू (ललीत) | शोभा दगडू पाटील, बी. एस्सी. भाग – ३ | १२ |
| ८ | पाऊस आला (कविता) | कु. योगेश देवांग, बी. ए. भाग ३ | १२ |
| ९ | एक पाऊल ... यशाकडे (वैचारिक) | दशरथ महादेव गोडसे, बी. ए. भाग – ३ | १३ |
| १० | साद आईची (कविता) | कु. चोपदार हुसेनसाब महिबूब, बी. ए. भाग – २ | १४ |
| ११ | आई (ललीत) | राजश्री उमराणीकर, बी. एस्सी. भाग – ३ | १५ |
| १२ | जातीयता समाजाला लागलेली एक किड (वैचारिक) | सुप्रिया यादव, बी. ए. भाग – २ | १६ |
| १३ | जगावे तर असे... (कविता) | कु. माळी महानंदा गंगाराम, बी. ए. भाग –३ | १७ |
| १४ | माझे कॉलेजचे दिवस (ललीत) | महानंदा गंगाराम माळी, बी. ए. भाग – ३ | १८ |
| १५ | श्रावण मी... (कविता) | कु. महानंदा गंगाराम माळी, बी. ए. भाग – ३ | १९ |
| १६ | शेतकरी (एकांकिका) | जास्वंदी आनंदा व्हनखंडे, बी. ए. भाग – ३ | २० |
| १७ | उन्हाळ्यातील दिवस (माहितीपर लेख) | सुप्रिया यादव, बी. ए. भाग – २ | २३ |
| १८ | मला आवडलेला संशोधक : निकोला टेस्ला (व्यक्तिचित्र) | पूजा मल्लाप्पा कोळी, बी. ए. भाग – ३ | २५ |
| १९ | पाऊस आठवणीतला (कविता) | योगेश देवांग, बी. ए. भाग – ३ | २७ |
| २० | माझी आई (कविता) | योगेश देवांग, बी. ए. भाग – ३ | २७ |
| २१ | गोड्या पाण्यातील मत्स्यशेती : शेतकऱ्यांसाठी एक वरदान (संशोधनपर लेख) | मिरजकर सुमैय्या फरदीन, बी. एस्सी. भाग – ३ | २८ |
| २२ | खरा धनवान कोण...? (कविता) | कु. निलेश अरविंद ओसवाल, बी. एस्सी. भाग –३ | २९ |
| २३ | देश (कविता) | कु. सुप्रिया शंकर सावंत, बी. एस्सी. भाग –३ | २९ |
| २४ | बोनसाय (बटुवृक्ष) (संशोधनपर लेख) | मिस्बाह शब्बीरबादशा नदाफ, बी. एस्सी. भाग – २, | ३० |
| २५ | जिजाईची महती (कविता) | कु. त्रिवेणी सिद्धनाथ लोंढे, बी. ए. भाग –३ | ३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | हजार पाचशेच्या नोटांचा निरोप समारंभ (विनोदी लेख) | कु. अनिता येडगे, बी. ए. भाग –३ | ३२ |
| २७ | चला करूया संरक्षण देवराईचे... (माहितीपर) | म्हमाणे प्रगती प्रकाश, बी. एस्सी. भाग – २ | ३३ |
| २८ | मनाला दार असते तर...! (कविता) | कु. स्वाती कांबळे, बी. ए. भाग –२ | ३५ |
| २९ | भारताची अंतराळात गरूडभरारी (विज्ञान) | रोहिणी आप्पासाहेब शिंदे, बी. एस्सी. भाग – ३ | ३६ |
| ३० | जस्संच्या तस्सं राहिल का सारं (कविता) | कु. सुप्रिया यादव, बी. ए. भाग –२ | ३७ |
| ३१ | स्त्रीचा सन्मान हाच खरा पुरुषार्थ...! (कविता) | कु. निलेश अरविंद ओसवाल, बी. एस्सी भाग –३ | ३७ |
| ३२ | ...आणि डाव्या हातात म्हातारीचा फोटो. (कथा) | सोनाली जमदाडे, एम. एस्सी. भाग –१ | ३८ |




# गावाकडच्या गोष्टी... (ललीत)

**कु. सविता आण्णाप्पा बिराजदार**, बी. एस्सी - भाग ३

पाव्हणं, तुम्हाला खरं सांगू? मला मनापासून लिहाव्या वाटल्या. गावकडच्या गोष्टी, लेखणी शिवशिवाय लागली मनात विचार उचंबळून येऊ लागले. मग काय सारचं जमून आलं आता लिहितोच. गावंच्या गावं आपल्या वैशिष्ट्यांसह डोळ्यांसमोर दिसायली लागली. अन् गावाकडल्या गोष्टी नजरेसमोर तरंगायला लागल्या. भावना आविष्कृत होऊ लागल्या आणि शब्दांची माळ तयार झाली. माळेची वाक्ये तयार झाली. गावकडच्या गोष्टी साकारू लागल्या.

काही दिवसांनी अशी गावं होती, अशी खिंडार होती. अशी शिवारं होती, अशी रानं होती, अशी जनावर होती, अशी माणसं होती. हे तुम्हाला सांगूनही पटणार नाही. मागं डोळ्यानं बघितलेली लिहिली ती माणसं होतीच तशी. खिशात तांबडा भोकपडका पैसा नसतानासुद्धा सुखासमाधानानं जगत होती. आल्या दिवसाला धैर्यानं तोंड देत होती. गरिबी, दारिद्रय हे सारं त्यांच्या पाचवीलाच पुजलं होतं. तरीसुद्धा ती माणसं जगत होती.जीवनावर अतोनात प्रेम करत होती. जग सोडून जाताना न घाबरता निघून जात होती. त्यांच्या माणुसकीचं नातं घट्ट विणलं होतं. ज्या गावी मी लहानाची मोठी झाले लहानपण ज्या मागासलेल्या दुष्काळी भागात गेलं ती गावं आता पूर्वीसारखी राहिली नव्हती. त्यांच्यात खूपच बदल झाला होता.

आता जर मी माझ्या गावी गेलो तर, गावात झालेले बदल माझ्या विचार शक्तीच्या बाहेरचे आहेत, असं मला जाणवतं. चार टाळकी सोडली तर मला गावात कुणी ओळखतदेखील नाहीत. गावातलीच माझ्याकडे बघताना म्हणतात, ''कोण ह्यो माणूस आपल्या गावात आलाय''!

पूर्वी आम्ही लहान असताना एखादा माणूस एसटीमधून बॅगा घेऊन उतरला तर बारकी पोरं वाऱ्यासारखी गावात जाऊन माणसाच्या घरी ''तुमचं बापू आल्याती निघाल्यात स्टॅण्डवरनं चालत''! असं न सांगता निरोप पोहोच करायची. बापू बऱ्याच दिवसांनी आल्यात म्हणल्यावर घरातलं वातावरण एकदम आनंदी व्हायच. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून व्हायचा. चेहऱ्यावर हसू उमटायचं. कुणीतरी दोघं जण, आणा बापू बॅगा आमच्याकडं, म्हणत न सांगता बॅगा घरी पोहचवायची तेही हसतमुखान, आनंदानं! आज मात्र दोन तास स्टॅण्डवर थांबला तर कुणी मदतीला येणार नाही, तुमचा निरोप पोहचवणारही नाही. तुमचं वझ्झ तुम्हालाच घेऊन फरफटत चालत घरी जावं लागेल. रस्त्यानं जाताना माणसं, म्हाताऱ्या बायका विचारणारच,आरं बापू कवाशी आला, कसं काय समदं बरं हाय नव्हं!थांबलास तर या उद्या चहा घ्यायला आणि तेही अगदी मनापासून. जाताना शेजारी-पाजारी माणसं, विचारणारचं निघाला व्हय? रजा इतक्यात संपली, जावा बाबानू सांभाळा जीवाला अन पोराबाळांना, लवकर परत या. या विचारण्यात माया असायची. माणुसकीचा ओलावा असायचा. आता कोण कोणाला विचारत नाही. आलास ये, गेलास जा. आमचं देणं-घेणं कसले. जीवणेघे बदल झालेत. ही माणसं जीवनातला आनंदच गमावून बसलीत. कळपात राहण्यातली मजाच घालवून बसलीत. एखादा कुणी घरी आला तर ही ब्याद कशाला आली आपल्या घरी, हा चेहऱ्यावरचा भाव. तुम्ही घरी आलाय म्हटल्यावर दहा जण तुमच्या घरी हजेरी लावतील. तुम्ही काय सांगताय ते ऐकायला घुटमळतील. सांजचं चहापानाला या, जेवायला या म्हणतील. पण आज जेवायला बोलवायचं सोडाच साधं चहाचं पाणीसुद्धा तुम्हाला देणार नाहीत. तुम्ही मोठे ऑफिसर असाल तर कपाळाला दहा आट्या पाडून तुमच्या बरोबर अबोला धरतील. माणूसकी कुठं लोप पावली ते मल कळत नाही.

शेतकऱ्यांच्या दारातली बैलगाडी आता लोप पावलीय. बैलगाडी ही शेतकऱ्याची शान होती. शेतकरी बैलांनी जीवापाड जपत होता. त्याचा बैलांवर खूप जीव होता. आता ही खिलारी बैलं राहिली नाहीत अन ती बैलगाडीही राहिली नाही. आता बैलगाडीच्या जागेवर १५-२० लाखांची आलिशान गाडी शेतकऱ्याच्या दारात उभी आहे. शेतकरी आता सहजासहजी लाखाच्या गोष्टी बोलतो आहे. नवा कोरा ट्रॅक्टर, मोठ्यानं टेपची गाणी लावून दोन दोन ट्रॉल्या लावून ऊस भरून साखर कारखान्याकडे धावतो आहे. दंडकीच्या खिशातन आता दहा दहा हजाराची बंडलं बाहेर निघताहेत.

सधन भागातला शेतकरी...मुख्यमंत्र्याला जरा फोन लाव रं गणपा, असं अगदी सहजवारी बोलतो आहे. हॉर्वेस्टरने कापणी-मळणी करून धान्य बाजूला काढतो. आठ-पंधरा दिवसांनी सहजासहजी स्वतःच्या गाडीनं मुंबईला चकरा मारतो

आहे. विमानानं दिल्लीला जातो आहे. आता पूर्वीचे दिवस पूर्णपणे विसरलाय... झऱ्याचं स्वच्छ निर्मळ पाणी हंड्यात भरून डोक्यावर हंडा, कमरेला कळशी घेऊन लचकत जाणारी नार आता राहिली नाही. आता घरोघरी नळ आलेत. वॉशिंग मशीन कपडे धुवून सुकवून हातात देते आहे. कांजीचं कापडं आता रुबाब वाढवताहेत.

आता गावात पार राहिला नाही. गावोगावी आता समाजमंदिरं उभी राहिली आहेत, ती पण एकदम चकाचक बांधली आहेत. समाजमंदिरांतून कार्यक्रम होताहेत. पारावर बसणारी चांडाळ चौकडी आज राहिली नाही. कधी काळी आमची गावं अशी होती. सूर्य असा उगवत होता. वीज अशी लखलखत होती. वावटळ हमखास डोळ्यात धूळ घालत होती. अंगावरची कापडं वाऱ्यावर उडत होती. दचके मारत एसटी स्टॅण्डवर थांबत होती. पारावर गावातल्या भानगडीचा खल चालत होता. चावडीच्या चव्हाट्यावर येऊन गाव त्याचा निवाडा करून घेत होतं.

भलरी म्हणत माणसं जोंधळा उपटत होती. आता जोंधळा उपटायला माणसी ४०० रुपये मागतात. सारच संपत चाललंय. सारंच व्यवहारावर येऊन ठेपलंय. जीवाची तगमग मी शब्दाशब्दात तुमच्यापुढं मांडलीय. आता ते दिवस परत येणार नाहीत ह्याचं खूप दुःख वाटतय. ते ओझं बरोबर घेऊनच जगायचं. त्या गोष्टी आठवतच आल्या दिवसाला- आल्या प्रसंगाला तोंड द्यायचय. आयुष्य कधी तरी संपणार आहे. चांगले दिवस पाहिले, हा मनातला आनंद खूप मोठा आहे. त्या आनंदाची काही पानं पानापानात इसरलेलं जीवन मी उभं केलंय. हे जीवन तुम्हाला हाताला धरून गावात समंदीकडे फिरवून आणल्याशिवाय राहणार नाही, याची पाव्हणं खात्री आहे.



# शेतकरी

धरणीमातेची सेवा करतो हा न्यारी.
याच्या मेहनतीमुळेच चालते दुनिया सारी.
हॉटेलमध्ये जेवताना श्रीमंत म्हणतो खूपच भारी,
पण ते धान्य पिकवण्यासाठी राबतो हा शेतकरी.
जणू कोणी त्याच्या नशिबी लिहिली आहे चाकरी,
दिवसभर राबून संध्याकाळी खातो फक्त भाजी भाकरी.
वर्षभर कसून भरतो हा धान्याची टोकरी,
दर कमी मिळाल्याने वर्षभर तडजोड करतो हा शेतकरी
शंभर रुपयांसाठी कधी कधी फिरतो घरोघरी
वसुलीसाठी बँकेची गाडी नेहमीच याच्या दारी
कर्ज न फिटल्याने उचलून नेली बैलजोडी
अन् भांडी सारी
कधी तरी गरिबीचा सूर्य मावळेल
इतकीच इच्छा बाळगतो भूमिपुत्र शेतकरी।।

**कु. राणी नाईक,** बी. एस्सी. भाग - ३ (केमिस्ट्री)

# अन्नदाता

घाम बापाचा सदा शेतीत जिरतो.
त्यामुळे वस्तीत या बाजार भरतो.
कोरडा परतून जातो पावसाळा
पूर अश्रूंचाच या डोळ्यात उरतो.
अन्नदात्यावरच का ही वेळ येते
कर्ज मागायला दारोदार फिरतो.
गांजलेल्यांना कुठे जावे कळेना
घाव जो तो थेट पोटावरच करतो.
का इथे या कष्टकर्त्या माणसाचा
गाय-बैलासारखा हा जन्म सरतो
प्रश्न हा इथल्या
व्यवस्थेलाच आहे
बाप का माझा जहर
घेऊन मरतो



**रोहिदास अभंगे,**
बी. ए. भाग - २


पात्रता नाही म्हणून आपण परस्परांना भेटणे बंद केले तर आपल्यापैकी बऱ्याच जणांना अज्ञातवासात जावे लागेल.- रवींद्रनाथ टागोर

# नोटाबंदी हा एक नाविण्यपुर्ण निर्णय-रमेश पवार (मुलाखत)

**कु. चैतन्या बिरादार,** बी. ए. भाग - २

(८ नोव्हेंबर २०१६ रोजी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेला नोटाबंदीच्या निर्णयाबाबत सामान्य जनतेचे मत काय आहे हे जाणून घेण्यासाठी श्री रमेश पवार या सामान्य नागरिकाची मुलाखत घेतली. त्यांच्या माध्यमातून नोटाबंदी बाबत सामान्य नागरिकाचे मत काय आहे याचा आढावा घेतला.)

**नोटाबंदी - नाविन्यपूर्ण निर्णय**

**प्रश्न - सामान्य नागरिक म्हणून नोटाबंदीच्या निर्णयाबाबत आपले मत काय?**

**उत्तर -** मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जो नोटाबंदीचा निर्णय घेतला ज्यामध्ये ५०० आणि १००० रूपयांच्या नोटा चलनातून रद्द करण्यात आल्या. तर शासनामार्फत घेण्यात आलेला हा एक महत्वपूर्ण निर्णय म्हणावा लागेल. कारण सर्वप्रथम देशातून काळा पैसा बाहेर काढणे व भ्रष्टाचार कमी करण्याचे निकष समोर ठेवून हा महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे हा योग्य निर्णय आहे असे मला वाटते.



**प्रश्न - नोटाबंदीनंतर सामान्य जनतेला जो त्रास सहन करावा लागला त्याबद्दल आपले मत काय?**

**उत्तर -** नोटाबंदीचा सर्वात जास्त फटका सामान्य जनतेला बसला आहे. कारण पैसे भरण्यासाठी किंवा पैसे बदलून घेण्यासाठी तसेच काढण्यासाठी बँकेत रांगा लागल्यामुळे कित्येक ज्येष्ठ नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले. कारण दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पैसा आवश्यक गोष्ट आहे. परंतु ज्या नागरिकांचे बँकेत रांगेत उभे राहून त्यांना प्राण गमवावा लागला. त्यांच्या कुटुंबियांना शासनामार्फत नुकसान भरपाई द्यावी अशी शासनाला माझी विनंती आहे.

**प्रश्न - नोटाबंदी निर्णयामागे मुख्य हेतू काय होता असे तुम्हाला वाटते?**

**उत्तर -** शासनामार्फत घेतलेला नोटाबंदी हा महत्वाचा निर्णय आहे. प्रामुख्याने देशाचा विकास करण्यासाठी काळा पैसा भारतात आणण्यासाठी हा नाविन्यपूर्ण निर्णय घेतला आहे. कारण नोटाबंदी म्हणजे अर्थव्यवस्थेचा व देशाचा विकास वेगाने करण्यासाठी घेतलेला निर्णय असे म्हटले जाते.

**प्रश्न - नोटाबंदीमुळे काळा पैसा भारतात येईल किंवा प्रत्येक व्यक्तीच्या बँक खात्यावर जमा होईल असे तुम्हाला वाटते का?**

**उत्तर -** काळा पैसा भारतात आणणे हा महत्वाचा निकष समोर ठेवून केंद्रशासनाने हा नोटाबंदीचा निर्णय घेतला आहे. परंतु सध्या स्वीस बँकेत असणारा काळा पैसा भारतात आणणे हे देशासमोर सर्वात मोठे आव्हान आहे. कारण त्यावर काही बंधने किंवा निर्बंध आहेत त्यामुळे काळा पैसा भारतात येईल याबाबत स्पष्ट मांडता येत नाही.

**प्रश्न - नोटाबंदीमुळे समाजात समता प्रस्थापित झाली आहे असे तुम्हाला वाटते का?**

**उत्तर -** नोटाबंदीमुळे समाजात बऱ्याच प्रमाणात गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी बऱ्याच प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येत आहे. कारण प्रत्येकाकडे असणारे पैसे बँकेत भरताना किंवा काढताना कोणतेही निर्बंध किंवा विषमता आढळत नाही. त्यामुळे नोटाबंदी मुळे समाजात समता प्रस्थापित झाल्याचे दिसून येते.

**प्रश्न - नवीन ५०० व २००० रुपयांच्या नवीन नोटांबद्दल काय सांगाल?**

**उत्तर -** नव्याने चलनात आलेल्या ५०० व २००० च्या नोटा व जुन्या ५०० व १००० च्या नोटा यांच्यात बऱ्याच प्रमाणात असमानता असल्याचे दिसून येते. परंतु नव्या

नोटा या बऱ्याच प्रमाणात विकसित आहेत शिवाय त्यात एका विशिष्ट प्रकारची चीप आहे त्यामुळे नवीन नोटा विकसित आहेत.

**प्रश्न - Cashless India बद्दल आपले मत काय?**

**उत्तर -** भारताचा विकास करण्यासाठी किंवा विकसित भारत बनविण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये Cashless चा स्वीकार करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण कॅशलेसचा स्वीकार करण्यामुळे सर्व व्यवहार वेळेवर होतात शिवाय ग्राहकाचे व बँकेतील कर्मचाऱ्यांचे श्रम कमी होतात.

**प्रश्न - नोटाबंदीमुळे बँकिंग क्षेत्रावर काय परिणाम झाला असे तुम्हाला वाटते.**

**उत्तर -** नोटाबंदीमुळे सामान्य जनतेलाच नव्हे तर बँकेतील कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याचे दिसून येते. कारण चलनातून रद्द झालेल्या नोटा जमा करून घेणे तसेच नव्या नोटांचा पुरवठा करणे यामध्ये बँक कर्मचाऱ्यांना महत्वाची जबाबदारी पार पाडावी लागल्यामुळे त्याचा बँकिंग क्षेत्रावर परिणाम झाल्याचे दिसून येते.

**प्रश्न - नोटाबंदीमुळे अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला असे तुम्हाला वाटते?**

**उत्तर -** नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येते. कारण नोटाबंदीच्या निर्णयानंतर जनतेला रोख रकमेचा किंवा नव्या चलनाचा पुरवठा लवकर किंवा योग्यवेळी न झाल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून बाजारपेठेत वस्तूची मागणी कमी झाली व विकासदर कमी झाला. शिवाय अर्थव्यवस्था काही काळ मंदीमध्ये गेल्यामुळे त्याचा प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येते.

**प्रश्न - नोटाबंदीचा निर्णय यशस्वी झाला असे तुम्हाला वाटते का?**

**उत्तर -** नोटाबंदीचा निर्णय जरी योग्य किंवा महत्वाचा असला तरी त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासना अयशस्वी ठरल्याचे दिसून येते. कारण बँकेतून पैसा काढण्यासाठी सर्वांना नियम सारखा असला तरी नव्या नोटांचे वितरण करण्यात काही पळवाटा असल्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी योग्य प्रकारे न केल्यामुळे काही प्रमाणात हा निर्णय अयशस्वी झाल्याचे दिसून येते. शिवाय ३१ डिसेंबर नंतर अर्थव्यवस्था सुरळीत होण्यासाठी अधिक कालावधी लागल्याचे दिसून येते.

# विसरलो

हुशारी मिळवताना शहाणपण विसरलो।
समजत नाही मी घडलो की बिघडलो।
तंत्रज्ञानामागे धावताना आत्मज्ञान विसरलो।
पैसा हिच शक्ती समजून ईश्वरभक्ती विसरलो।
सुख शोधताना जीवनाचा बोध विसरलो।
सुखासाठी साधने वापरताना साधना विसरलो।
भौतिक वस्तूच्या सुखात नैतिकता विसरलो।
धन जमा करताना समाधान विसरलो।
तंत्रज्ञान शोधताना ते वापरण्याचे भान विसरलो।
परीक्षार्थी शिक्षणात हाताचे कौशल्य विसरलो।
टी.व्ही. आल्यापासून बोलणं विसरलो।
जाहिरातींच्या माऱ्यामुळे चांगलं निवडणं विसरलो।
गाडी आल्यापासून चालणं विसरलो।
कॅलक्युलेटर आल्यापासून बेरीज विसरलो।
संगणकाच्या वापराने विचार करणं विसरलो।
संकरित खाल्ल्यामुळे पदार्थाची चव विसरलो।
फास्टफुडच्या जमान्यात तृप्तीचे ढेकर विसरलो।
ए.सी. मध्ये बसून झाडाचा गारवा विसरलो।
परफ्युमच्या वापरामुळे फुलांचा सुगंध विसरलो।
चातुर्थ मिळवताना चरित्र विसरलो।
जगाच्या भूगोलात गावचा विकास विसरलो।
बटबटीत प्रदर्शनात सौंदर्याचे दर्शन विसरलो।
रिमिक्सच्या गोंगाटात सुगमसंगीत विसरलो।
मृगजळामागे धावताना कर्तव्यातला आनंद विसरलो।
स्वत:मध्ये मग्न राहून दुसऱ्याचा विचार विसरलो।
सतत धावताना क्षणभर थांबणं विसरलो।
जागेपणी सुख मिळवताना सुखानं झोपणं विसरलो।

- **कु. राणी नाईक,** बी. एस्सी. भाग - ३



जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची रोटी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या. रोटी तुम्हाला जगण्यास मदत करेल तर पुस्तक तुम्हाला जगावे कसे ते शिकवेल. - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# वृद्धाश्रम (वैचारिक)

**कु. चैतन्या बिरादार,** बी. ए. भाग - २

आजच्या आधुनिक युगात प्रत्येकाचे आयुष्य हे इतक्या धावपळीचे व गुंतागुंतीचे बनले आहे की, प्रत्येकजण नेहमी स्वतःच्या कामात गुंतलेला आहे. त्यामुळे दुसऱ्यांना मदत करण्यासाठी त्याला कधीच वेळ मिळत नाही. त्यामुळे सर्व नाती दुरावत चालली आहेत. पूर्वी लांब तारेच्या टेलिफोनमुळे लांबची माणसं जोडली जात असायची. परंतु आजच्या स्मार्टफोन किंवा मोबाईलमुळे जवळची नाती दुरावत चालली आहेत.



ज्येष्ठ मंडळी किंवा वडीलधारी मंडळींचा आदर कमी होत आहे. नात्यामधील प्रेम - ममता - आपुलकी - या गोष्टी हळूहळू लुप्त होत आहेत. म्हणून मी आता जी कथा लिहिणार आहे ती याच संदर्भातील आहे. ज्यामध्ये आपण आपल्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या वडीलधारी मंडळींना वृद्धाश्रमाचा रस्ता कसा दाखवतो याचा छोटासा संदर्भ या कथेत आहे. त्यामुळे ही कथा तुम्हाला नक्कीच आवडेल.

एका छोट्या गावात एक छोटे कुटुंब रहात होते त्या कुटुंबात फक्त दोन सदस्य होते. वडील आणि मुलगा. वडील धोंडिबा हे सेवानिवृत्त झाल्यामुळे घरीच असतात मुलगा रमेश जीवनात खूप संघर्ष करून यशस्वी झालेला असतो.तो एका मोठ्या नोकरीच्या पदावर कामास लागतो. तो आपले कार्य चांगल्या प्रकारे पार पाडत असतो. हे दोघेही बापलेक कुटुंबात आनंदाने राहत असतात. परंतु वडीलांच्या मनात मुलाचे लग्न केले पाहिजे असे विचार येत असतात. आणि एका सुशिक्षित सुंदर आणि समंजस मुलीसोबत त्याचा विवाह ठरतो. रमेश हा धोंडिबाचा एकुलता एक मुलगा असल्यामुळे त्याचा विवाह थाटामाटात पाहुणे मंडळींच्या उपस्थित आनंदाने पार पडतो. लग्न झाल्यानंतर थोड्याच दिवसात सून घरी येते. धोंडिबा, रमेश व सुनबाई सुरेखा असे तिघे आनंदाने राहत असतात. घरी,वैभव,सुख,समृद्धी आनंद असतो. परंतु अचानक घरात अघटित घडते. सुरेखाला आपल्या सासऱ्याचं स्वभाव त्यांच वागणं याची किळस वाटायला लागते. म्हणून त्यांना वृद्धाश्रमात पाठवून दोघेच सुखाचा संसार करू असा विचार तिच्या मनात येतो. एक दिवस सासऱ्यांना वृद्धाश्रमात पाठवायचा निर्धार करते. आणि पतीच्या सहमतीने हे सर्व करायचे ती अगदी शांतपणे आपला निर्णय पतीला सांगते.

तेव्हा प्रथम रमेशला पत्नीचे बोलणे ऐकून धक्का बसतो. त्याला वाईट वाटते. म्हणून तो तिला स्पष्ट नकार देतो. पण नंतर मात्र त्याला तिचा निर्णय मान्य करणे भाग पडते व इच्छा नसतानाही नाइलाजाने कोणताही विचार न करता तो त्या निर्णयास होकार देतो व त्यांना वृद्धाश्रमात पाठवण्याची तयारी करू लागतो. एक दिवस ठरवला जातो, वडीलांना वृद्धाश्रमात पाठवण्याचा. ठरल्याप्रमाणे तिघेही वृद्धाश्रमात जाण्यासाठी निघतात. जाताना सूनबाई सासऱ्यांना समजावून सांगत असते की, तुम्हाला आता वृद्धाश्रमाची गरज आहे व तेथे गेल्यावर तुम्हाला खूप मित्र भेटतील. आणि तुमचे शेवटचे दिवस अगदी आनंदात जातील. अशी ती त्यांची समजूत घालत असते. वृद्धाश्रमात पोहचल्यावर रमेश सर्व औपचारिकता पूर्ण करत असतो तेव्हा सहज त्याचे लक्ष दुसरीकडे जाते. तेथे त्याचे वडील व वृद्धाश्रमाचे अधिकारी अगदी सलगीने एकमेकांशी बोलत असतात. तेव्हा तो त्यांना विचारतो तुमची माझ्या वडिलांशी ओळख कशी, तेव्हा त्या अधिकाऱ्याच्या तोंडातून बाहेर पडणारे शब्द ऐकून त्याचे मन सुन्न होते. काळजाला पिळ पडतो. हृदयाचे पाणी पाणी होते. ते शब्द असे होते, ''अरे आम्हा दोघांची खूप दिवसांची ओळख आहे. कारण २८ वर्षापूर्वी यांना अपत्य नसल्याने त्यांनी माझ्याकडून एका अनाथ बालकाला दत्तक घेतले होते. तेव्हापासून आमची ओळख आहे.'' हे शब्द ऐकून रमेशला धक्का बसतो व त्याच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागतात. त्याला स्वतःचीच लाज वाटते. ज्यांनी मला लहानाचं मोठं केलं. मला शिक्षण देऊन मोठा अधिकारी बनवलं. एवढंच नव्हे तर मी स्वतः अनाथ असल्याची जाणीवही होऊ दिली नाही अशा वडीलांना मी अनाथ आश्रमात ठेवतो आहे केवढी ही लाजिरवाणी गोष्ट!

कथा इथे संपते परंतु माणुसकीचे बोल खूप काही सांगून जातात.

# ग्रंथ हेच गुरू (ललीत)

**कु. शोभा दगडू पाटील,** बी. एस्सी भाग - ३



**''ग्रंथाच्या स्पर्शाने पायातल्या बेड्या तुटोत ग्रंथाच्या स्पर्शाने भिंतीचे आकाश बनो.''**

प्रत्येक व्यक्तीला दोन गुरु असतात ते म्हणजे आईवडील आणि शिक्षक त्याच प्रमाणे ग्रंथ हा मनुष्याचा तिसरा गुरु आहे. संकटकाळी मदत करतो तो खरा मित्र. पण असे दुर्मिळ मित्र मिळणे कठीण असते. अशावेळी आपल्या सुखदुःखात मदत करतात ते खरे ग्रंथच. ग्रंथ आपल्याला भरपूर काही शिकवतात. आपला एकटेपणा ग्रंथामुळे नाहीसा होतो. ग्रंथ आपले रंजन करतात. एखाद्यावेळी आपल्याला कंटाळा आला तर पूर्वी वाचलेले ग्रंथ आपल्या मनाची मरगळच दूर करतात. एकटेपणाची जाणीव नाहीशी करतात. ग्रंथ आपल्याला भरभरून ज्ञान देतात त्याचप्रमाणे आपली विषण्णता कंटाळा नाहीसा करतात.

एकविसाव्या शतकात दूरचित्रवाणी, इंटरनेट, संगणक अशा माध्यमांमुळे माणसे ग्रंथालयापासून दूरावत चाललेली दिसतात. ग्रंथापासून वंचित होऊ लागली आहेत. पण असे करून चालणार नाही. ग्रंथ हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा मूलमंत्र आहे. ग्रंथाशिवाय आपल्याला जमणार नाही असे आपल्याला वाटले पाहिजे. अन्नाबरोबरच ग्रंथही आपली गरज आहे असे प्रत्येकाला वाटले पाहिजे. तरच त्यात आपल्याला अभिरूची निर्माण होईल. ग्रंथाचा आणि मनुष्याचा संबंध फार पूर्वीचा आहे. ग्रंथामुळे माणसाचे वर्तमानकालिन जीवन भूतकाळ आणि भविष्याशी जोडलेले आहे.

माणसाला भूतकाळात डोकावून बघायला आणि भविष्यकाळाची स्वप्ने बघायला रंगवायला कोण शिकवत असेल तर ते ग्रंथच. ग्रंथ वाचनाची आवड कमी होत चालल्यामुळे आपला देश प्रगतीपथावर पोहचण्यासाठी विलंब होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या काही थोर विचारवंतांनी तर आपली स्वतःची ग्रंथालयेच उभी केली आहेत.

'ग्रंथ हेच गुरु' अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धारणा होती. ग्रंथाशिवाय मी जगू शकणार नाही. न. चिं. केळकर यांनी तर ग्रंथाची व्याख्या ''ज्ञानाची सदावर्ते'' अशी केली होती. ग्रंथाच्या वाचनाने माणसाची भाषाशैली सुधारते. त्याचा शब्दसंग्रह वाढतो. त्याच्या बुद्धीला विचार करण्याची शक्ती मिळते. असे हे ग्रंथ खूप महान आहेत. ग्रंथालयातील ग्रंथ हे केवळ तेथे ठेवण्यासाठी नाहीत तर ते वाचनासाठी आहेत. 'गाव तेथे ग्रंथालय' हे आजच्या सरकारचे धोरण आहे. खरंच ग्रंथासारखा दुसरा मित्र नाही. ग्रंथ म्हणजे मानवाची उमेद जागी करणारे त्याच्यात चैतन्य निर्माण करणारे असतात. माणसाला त्याच्या ध्येयापर्यंत पोहचवणारे त्याचे महत्वाचे साधन कोणते असेल तर ते ग्रंथच!

"Good books are like light house, so be friend of good books to get developed in to a loyal citizen."

प्रत्येकानेच ग्रंथाला आपले मित्र बनवले, त्याच्या सहवासात प्रत्येकजण राहिला तर प्रत्येकाचे जीवन हे चांगले होण्यास मदत होऊ शकेल.

# पाऊस आला

पाऊस आला, वारा आला
पान लागले नाचू
थेंब टपोरे गोरे गोरे
भरभर गारा वेचू!

गरगर गिरकी घेते झाड
धडधड वाजे दार कवाड
अंगणातही बघता बघता
पाणी लागले साचू!

अंगे झाली ओली चिंब
झूलू लागला दारी लिंब
ओली नक्षी, पाऊस पक्षी
कुणी पाहतो नाचू!

ओसरती सर गेली
उन्हे ढगातून आली
इंद्रधनुष्यामध्ये झळकती
हिरे माणिक पाचू!

**योगेश देवांग,** बी. ए. भाग ३ (इकॉनॉमिक्स)

# एक पाऊल ... यशाकडे (वैचारिक)

**दशरथ महादेव गोडसे,** बी. ए. भाग - ३

**संघर्ष एक अटळ सत्य :-** संघर्ष आपल्या इच्छित गोष्टी साध्य व्हाव्यात म्हणून केला जाणारा प्रयत्न म्हणजेच संघर्ष होय. मनुष्य पृथ्वीवर जन्माला आल्यापासून त्याचा जगण्यासाठी संघर्ष सुरू होतो. आणि मग संघर्ष आयुष्याच्या शेवटापर्यंत त्याची पाठ सोडत नाही. कारण हा संघर्ष प्रत्येकाच्या जीवनात अटळच असतो. मग मला सांगा जी गोष्ट जीवनात अटळ आहे तिला टाळण्याचा प्रयत्न का बरे करावा? खरी गोष्ट तरी अशी आहे की,आयुष्यात येणारा प्रत्येक क्षण हा संघर्षच आहे. उजाडणारा प्रत्येक दिवस एक नवीन संघर्ष घेऊनच येत असतो. होय ना? या संघर्षाची वेगवेगळी रुपे आहेत. तर असा हा संघर्ष कितीतरी स्वरुपाचा असतो. तो कधी आपल्याला आर्थिक बाबतीत भेडसावेल तर कधी मानसिक संघर्ष आपल्या मनाची अस्वस्थता वाढवेल. कधी पारिवारिक तर कधी सामाजिक संघर्षाला तोंड द्यावे लागेल.मग या संघर्षापासून दूर तरी किती आणि कुठे जाणार! कारण प्रत्येक ठिकाणी संघर्ष हा आहेच. मग तो कोणत्याही स्वरुपाचा असेल पण असतोच तो आपल्या जीवनाची पाठ कधी सोडत नाही. बघा ना बालवयात आपणास संघर्ष करावा लागतो. शालेय जीवनात शिक्षणासाठी संघर्ष करावा लागतो. तरूण वयात नोकरीसाठी व त्यानंतर आर्थिक पारिवारिक व समाजातील स्वतःच्या अस्तित्वासाठी केला जाणारा संघर्ष आणि आयुष्याच्या शेवटी एकटेपणाचा संघर्ष. या सर्व प्रकारच्या संघर्षातील सर्वांना सामोरे जावेच लागते. अशा या संघर्षाला नावे तरी किती देणार? कुणी याला चाचणी म्हणतो कुणी परीक्षा तर कुणी कसोटी म्हणतो. अशा प्रकारची संघर्षमय आव्हाने म्हणजेच आयुष्य असते. या संघर्षामध्ये केलेल्या साऱ्या कष्टाचे सार्थक तेव्हाच होते. जेव्हा आपण इच्छित यशापर्यंत पोहचतो. मात्र हा विचार तात्पुरता बाजूला ठेवू या की, यश किंवा अपयश हार अथवा जीत यांना संघर्ष करताना महत्व द्यायचं नसतं. महत्व द्यायचं ते योग्य दिशेने कठोर परिश्रम करण्याला.



आता असा ही विचार करू या की, केलेल्या संघर्षाचा आपणास अपेक्षित असा परिणाम आला नसेल तर ठीक आहे तरी पण खचून जाण्याचे काहीच कारण नाही. कारण कोणतेच परिश्रम कधीच वाया जात नाहीत आता केलेल्या धडपडीचा फायदा नक्कीच हायसे वाटणारा असतो. मात्र प्रत्येक वेळी तनमनाने पराकोटीचे प्रयत्न करायचेच असतात. आणि मनात ही एक जिद्द कायम ठेवायची असते.

‘रास्ते में रुक, मै दम लेलूं
मेरी आदत नहीं।
लौटकर वापस चला जाऊ
मेरी फितरत नहीं।’

मग प्रयत्न म्हणजे तरी नक्की काय? जगाचा नियम असा आहे की कोणतीही गोष्ट फुकटात मिळत नसते. जेवढा खड्डा असेल तेवढाच उंचवटा होतो. उज्वल भवितव्याचे शिखर सर करण्यासाठी श्रम करणे तेही कठोर अपरिहार्य आहे. टेकडी चढताना श्रम होतात पण उंच ठिकाणी पोहचल्यावर सर्व श्रमांचा परिहार आपोआपच होतो. प्रयत्न ही देखील अशीच प्रवृत्ती आहे. त्याचा अर्थ म्हणजे आजूबाजूच्या परिस्थितीतून आणि उपलब्ध गोष्टींवर विचार करून त्याचा योग्य वापर करण्याची व नवीन काही करण्याच्या जिद्दीने इतरांची मदत घेऊन विकासाच्या दृष्टीने करावयाची यशस्वी धडपड होय. मग अशी धडपड करताना आपल्याजवळ दोन गोष्टी हव्यातच त्या म्हणजे प्रेरणा आणि आत्मविश्वास. कृतीला किंवा जाणीवेला ज्यामुळे प्रोत्साहन मिळेल. त्याला प्रेरणा म्हणतात. प्रेरणा ही एक अशी शक्ती आहे की जिच्यामुळे तुमचं सगळं आयुष्य बदलून जाऊ शकतं. त्याचप्रमाणे आत्मविश्वास हा काही वारसा हक्काने मिळणारी चीज नसून ती आप कमाई असते. प्रत्यक्ष अनुभवायची असते. भर घालून आत्मविश्वास हळूहळू वाढवायचा असतो मात्र सुरुवात करावयाची असते ती आकांक्षेच्या बळावरच!

आता हे मात्र लक्षात असायला हवं की, ‘कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन’ कोणत्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करीत राहणं प्रत्येक मनुष्याचं कर्तव्य आहे. मग कर्तव्यात आपण कसूर का करावी? जो धाडसानं पाऊल पुढं टाकतो त्याच्या पायाशी यश लोळण घेते. भित्यापाठी नेहमीच

ब्रह्मराक्षस लागलेला असतो. महान विचारवंत एल्विन सी बिल्स म्हणतात त्याप्रमाणे, यशस्वी होवू याचा अर्थ अंतीम ध्येयं गाठणं असा आहे. याचा अर्थ प्रत्येक लढाई जिंकणं असा नसून संपूर्ण युद्धच जिंका असा आहे! यासाठी प्रयत्न करताना आपल्या स्वप्नांना शाबूत ठेवायला हवं. एक कवी याबाबत म्हणतात, ''अपने सपनों को सलामत रखिए इन सपनों को साकार करने के लिये प्रयास किजीए। और जब सपने सच्चाई में उतरेंगे तब अपनी मौज में आनंद मनाई ये। क्योंकि उन्ही में वह आनंद है जो सयाने लोगों को नसीब नही होता। आणि यशाविषयी नुसती स्वप्नंच बघून चालत नाही तर आपलं स्वतःचं सामर्थ्य ओळखून त्याचा पुरेपूर वापर करून नियमित टप्यानं एक एक यश मिळवावं लागतं.

जीवन जगणे हाच एक संघर्ष आहे आणि या संघर्षात आपल्याला यशस्वी व्हायचं आहे.

# साद आईची



महिन्यामागून महिने
शेवटी वर्ष सरून जातं
वृद्धाश्रमाच्या पायरीवर
वाट तुझी पाहते!
भिजून जातो पदर
अन मन रिते राहते
कधी कधी मात्र
तुझी मनी ऑर्डर येते!
पैसे नकोत यावेळी
तूच येऊन जा
बाळा मला तुझ्या
घरी घेऊन जा!
तुझा बा होता तोवर
काळ बरा गेला
तुझी आठवण काढत
उघड्या डोळ्यांनी गेला!
शेवटपर्यंत सांगत होता
लेक माझा भला
तू मोठा साहेब
त्याचं मोठं कौतुक त्याला!
माझ्या हृदयात फोटो
तुझा तू पाहून जा.
बाळा मला तुझ्या
घरी घेऊन जा!
दुष्काळाच्या साली
जन्म तुझा झाला
तुझ्या दुधासाठी
आम्ही चहा सोडून दिला!
वर्षासाठी एक कपडा
पूरवून पूरवून घातला
सालं घातली बापाने
पण तुला शाळेमधी घातला
हवंतर तू हे
सगळं विसरून जा
पण बाळा मला
तुझ्या घरी घेऊन जा.
धुणी भांडी करीन मी
केरकचरा भरीन मी
पुरणपोळ्या आळूवड्या
तुझ्यासाठी रांधीन मी
तुझ्या घरची कामवाली
म्हणून घेऊन जा
पण बाळा मला
तुझ्या घरी घेऊन जा.
थकले रे डोळे बाळा
प्राण कंठी आले
तुझ्याविना जगणे
आता मुश्किल झाले
विसरू कशी तुला मी
तुझ्यामुळे आई झाले
बाळ माझं कुलभूषण
पोरकी का मी झाले
आता माझ्या थडग्याशी
'आई' म्हणून जा
जमलंच तर हा
वृद्धाश्रम पाडून जा.

**- चोपदार हुसेनसाब महिबूब,**
बी. ए. भाग - २


प्रत्येकावर विश्वास ठेवणे हे धोकादायक आणि कुणावरही विश्वास न ठेवणे हे खूपच धोकादायक होय. - अब्राहम लिंकन

# आई (ललीत)

**कु. राजश्री उमराणीकर**, बी. एस्सी भाग - ३

**''आई म्हणोनी कोणी आईस हाक मारी**

**ती हाक येई कानी मज़ होय शोककारी''**

'आई' या शब्दातच खूप मोठा अर्थ दडलेला आहे. 'माँ' म्हणजे 'आई' होय. 'आई' हे जगातले एक महान दैवत आहे. जेथे देवांनाही नतमस्तक व्हावे लागले. आई हे एक असे न्यायालय आहे की जेथे सर्व गुन्हे माफ होतात. आई ही जगतजननी जगतमाता आहे. आईची महती वर्णावी तितकी कमीच आहे. तिचे उपकार न फिटणारे आहेत.



अशी ही आई आपल्या बाळाला नऊ महिने पोटात वाढविते. त्याला जन्म देते वेळी असह्य वेदना सहन करून त्याला ती ह्या जगात आणते. त्याला पाहताच ती सर्व वेदना विसरुन जाते. एवढेच नव्हे तर ती त्याला लहानाचं मोठं करते. डोळ्यांत काजळ घालून, रात्रभर जागून, तळहाताचा पाळणा करून, आपण ओल्या कपड्यावर झोपून, आपल्या बाळाला सुक्या कपड्यावर झोपविते. स्वतः पोटाला चिमटे घेऊन आपल्या बाळाला ती चिमणचारा भरविते. अशी ही आई असते.

**'आईच्या कुशीत जगले निवांत**

**कधी ना भासली कशाचीच भ्रांत''**

असं हे बाळ आईच्या कुशीत आईच्या मांडीवर निवांत हसत खेळत असतं. त्याला कशाचीच चिंता नसते. काळजी नसते. अशावेळी आई आपल्या बाळावर लहानपणीच चांगले संस्कार करीत असते. बाळ काही कारणासाठी रडायला लागलं तर त्याची समजूत काढते. ती त्याला म्हणते,

**'रडू नको रे माझ्या बाळा**

**हसण्यासाठी जन्म आपुला.'**

अशा प्रकारे ती आपल्या बाळाची काळजी घेत असते. आई ही मुलांची पहिली शिक्षिका असते. ती आपल्या बाळाला या जगात कसं राहायचं मोठ्यांचा आदर कसा राखायचा अशा अनेक गोष्टी ती शिकवित असते. म्हणूनच आईला अनेक उपमा दिल्या जातात. 'आई ही दुधावरची साय असते' लंगड्याचा पाय आहे, वासराची गाय आहे. लेकराची माय आहे. आरतीतील ज्योत आहे' आई असताना आपल्याला कशाचीच उणीव भासत नाही. पण ती नसली तरी नाही म्हणवत नाही.

**'आईचे शिक्षण शाळेहून मोठे**

**हसत जगावे तिनेच शिकविले.'**

आईचे शिक्षण इतके महान आहे की त्याची तुलना ही करता येणार नाही. जसे जिजाऊ मातेने शिवाजीला शिक्षण दिले म्हणून शिवाजी राजे हिंदवी स्वराज्याची स्थापना करू शकले व शिवाजीचा शिवाजी राजा बनले.

**'इथेच काशी इथेच ईश्वर**

**प्रेमळ आई अथांग सागर**

**माया उदंड देते, माऊली देवाहून थोर.'**

जो आईची सेवा करतो तिला सतत प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करतो, आईचा आदर करतो त्याला काशीचे पुण्य प्राप्त होते.

**'थोर तुझे उपकार आई**

**थोर तुझे उपकार!'**

अशा या आईचे वर्णन करावे तितके थोडे आहे. तिचे उपकार फेडण्याचा मी कितीही प्रयत्न केला तरी तिचे उपकार कधीच फिटणार नाहीत. तिचे उपकार अनंत आहेत की त्यांची गणना करता येणार नाही. अशा याआईचं थोरपण व्यक्त करताना माझ्याकडे शब्द अपुरे पडतात. अशा या आईला माझे कोटी कोटी प्रणाम.

**आई तुझा आशीर्वाद**

# जातीयता समाजाला लागलेली एक किड (वैचारिक)

**सुप्रिया यादव**, बी. ए. भाग - २

भारत म्हणजे विविधतेत एकता जपणारा देश. धर्मनिरपेक्ष म्हणवणारा विविधतेने नटलेल्या या देशात काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत अनेक जाती धर्म वंशाचे लोक आनंदाने राहताना दिसतात. जातीधर्म यांच्या पलिकडे जाऊन फक्त माणुसकीच जपणारा एक समाजही याच भारतात राहतो. मग याच समाजात मित्र-मैत्रिणी पती-पत्नी, भाऊ-बहिण ही आपुलकीची नाती आयुष्यभरासाठी सोबत राहतात. तिथे जातीला महत्व नसून आयुष्याच्या चांगल्या वाईट सुखदुःखात साथ देणाऱ्या कदाचित रक्ताचं नसून ही रक्तापेक्षा जास्त साथ देणाऱ्या फक्त आणि फक्त माणुसकीलाच जास्त महत्व असतं. नाहीतरी थोरामोठ्यांनी म्हटलेलेच आहे 'माणुसकी हीच जात आणि मानवता हाच धर्म' असं असूनही जातीयतेला खतपाणी घातलं जातंय ते का आणि कशासाठी?



असं म्हणतात नाण्याला दोन बाजू असतात एक चांगली आणि दुसरी वाईट. तसंच काही जातीयतेच्या बाबतीत देखील आहे. पण या चांगल्या पेक्षा वाईटच समाजात आजच्या घडीला दिसून येत आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या रूढी परंपरा आजही लोक मानतात. त्यामुळे त्याचा त्रास इतरांना होतो. उच्चवर्णीय म्हणवणारे इतरांना शूद्र समजतात पण त्यांना माहीत नाही खरे शूद्र तेच आहेत. फक्त जातीनेच नाहीतर विचारानेसुद्धा. या जातीयतेने समाजाला सर्वांगाने पोखरून काढले आहे. म्हणूनच आज एक भारतीय दुसऱ्या भारतीयावर चवताळून उठतो. कारण तो आधी जात मानतो नंतर भारतीयत्व. आज भारतातल्या प्रत्येक राज्यात जातीयतेचा लढा चालू आहे. सवर्णाविरुद्ध दलित. स्वातंत्र्यापूर्वी जी वागणूक दलितांना दिली जात होती तशीच वागणूक काही प्रमाणात आजही या समाजाला दिली जात आहे. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार केला जातो. उत्तर प्रदेश, बिहार यासारख्या कमी विकसित राज्यात हे प्रमाण जास्त आहे. पण गुजरातसारख्या विकसित राज्यात याच्यापेक्षा दाहक परिस्थिती आजही आहे. हे काही दिवसांपूर्वी उघडकीस आले. काही स्वयंभू गोरक्षकांनी मेलेल्या गाईचे कातडे काढणाऱ्या तरूणांना बेदम मारहाण केली आणि त्यावर कळस म्हणजे या मारहाणीचे चित्रीकरण करून ते समाजमाध्यमांवर पसरविले. खरे इथं माणूस माणसाचा शत्रू नव्हता तर एक जात दुसऱ्या जातीची शत्रू होती. आणि आजही आहेच. तसं नसतं तर अशा प्रकारची घटना कधीच घडली नसती. देशातल्या एका गरीब दलिताला गोमांस लपविल्याच्या खोट्या आरोपामुळे जीव गमवावा लागला नसता.

जातीयतेची ही किड आपल्या समाजात इतक्या खोलवर रूजली आहे की, तिला रूजवायला जितका काळ गेला त्याहीपेक्षा जास्त काळ ती नष्ट व्हायला लागेल. जग वेगाने जवळ येत आहे. जवळ येत चाललंय असं म्हणतात मात्र असं असलं तरी माणुसकी मात्र तितक्याच वेगाने दूर होत चालली आहे. प्रसंगी एक जात दुसऱ्या जातीसाठीच्या द्वेषापायी आपल्यांचेही जीव घ्यायला मागेपुढे पाहत नाही. याचं सगळ्यात पहिलं उदाहरण देता येईल ते म्हणजे आंतरजातीय विवाह. आंतरजातीय विवाहाला समाजात अतिशय कडवा विरोध केला जातो आणि विरोधामुळेच आपली समाजात प्रतिष्ठा कमी होईल वाळीत टाकलं जाईल. इज्जत जाईल. समाजात जगणं मुश्किल होईल म्हणून आंतरजातीय विवाह केलेल्या मुलींची-मुलांची हत्या त्यांचाच भाऊ, वडील, काका या मंडळींकडून होत असते. कारण त्यांना नात्यापेक्षा जात प्रतिष्ठा जास्त महत्वाची असते. यातूनच जातीयता वाढीला लागते. तू हिंदू-मी मुस्लिम तो इसाई अशी एक दृढ भावना मनामध्ये निर्माण होते आणि हिच भावना एका ठिणगीसारखं काम करते. ठिणगी छोटी असली तरी आग मात्र मोठी असते. त्या आगीत अनेक आशा-आकांक्षा इच्छा यांना तिलांजली मिळालेली असते. म्हणून कट्टर जातीयता जरी निर्माण होत असली तरी शेवटी मात्र राखच असते. मग तरीही स्वतःच्या जातीसाठी उपोषणे मोर्चे आंदोलनाची मागणी करून काहीच उपयोग नाही. कारण आज कोणत्या ना कोणत्या धर्माचे लोक हे मार्ग अवलंबिताना दिसतात.



जेव्हा एखाद्याला वाटत असेल की त्याने आयुष्यात एकही चूक केली नाही तेव्हा त्याने एकही नवी गोष्ट करुन पाहिली नाही असे समजावे. - ॲल्बर्ट आइन्स्टाइन

समाजात असणारी ही जातीयता नष्ट करायलाच हवी. मी हिंदू-मुसलमान-गुजराती किंवा कन्नड तेलगू नसून सर्वप्रथम भारतीय आहे ही भावना करायला हवी. कारण म्हणतात ना, ''रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल' ही सुरूवात आपल्याला एक ना एक दिवस एकसंघतेकडे नक्कीच घेऊन जाईल. कोणतीही गोष्ट क्रिया चालू होते ती संपण्यासाठीच एक दिवस असा नक्की उगवेल जेव्हा कट्टर जातीयतेची मुळे नष्ट झालेली असतील तेव्हा शाळेतील मुलेच काय तर मोठी माणसे, जातीयवादीसुद्धा म्हणतील, 'सारे भारतीय माझे बंधु-भगिनी आहेत. आणि खऱ्या अर्थाने माझं त्यांच्यावर प्रेम आहे मग तो कोणत्याही जातीधर्माचा असो आणि तिच भारताची उद्याची सर्वात मोठी शक्ती असेल.'

# जगावे तर असे...

असे जीवन जगावे की
सगळ्यांना हेवा वाटावा
एखाद्या अरण्यात वाट चुकावी
विश्रांती घेण्यासाठी
एखाद्या झाडाखाली बसावे
आणि समोर विंचू दिसावा
त्याला मारण्यासाठी दगड उचलावा
अन् त्याच दगडाखाली साप निघावा
त्याने आपला पाठलाग करावा
रस्त्यावर ठेचकाळत पडताच
वेलींनी आच्छादलेल्या विहिरीत पडावे
अन् पाण्यात भली मोठी मगर असावी
तिने वेध घेण्याअगोदर
एका छोट्या फांदीचा आधार मिळावा
वर येण्यासाठी धडपड करत असताना
काठावर पाण्याच्या शोधात
असणारा वाघ असावा आणि
त्याचा भितीने फांदीवरील
तोल सुटावा आणि त्या फांदीला असणाऱ्या
मधाच्या पोळ्याचा भडका उडावा
खाली माशांनी चावा घ्यावा
अशा अवस्थेत मधाच्या पोळ्यातून
पडणारे मधाचे थेंब तोंडाने
झेलण्याचा प्रयत्न करावा
त्याला जीवनाची, खरीखुरी ताकद असे म्हणतात.

**-कु. माळी महानंदा गंगाराम,**
बी. ए. भाग -३



# माझे कॉलेजचे दिवस (ललीत)

**कु. महानंदा गंगाराम माळी,** बी. ए. भाग - ३

यावर्षी आणखी एक वर्ष संपेल. पण... नेहमीप्रमाणे असणार नाही. यावेळच्या भावनाच काही वेगळ्या असतील कारण हे आपले शेवटचे वर्ष आहे. आणि अचानक इतकी वर्ष सोबत असणारे हे कॉलेज ऑफ लाईफ अचानक संपेल... जसजसे दिवस जातायेत तसे Count down सुरू झालंय व असे वास्तव जणू काही हातातून काहीतरी निसटून चाललंय. होय कारण आमच्या शेवटच्या वर्षातलं विद्यार्थ्यांच्या हातून कॉलेज लाईफ निसटत चाललंय.

आज शेवटच्या वर्षी जेव्हा मागे वळून पाहते ते मयुरपंखी दिवस होते. माझ्या कॉलेजचे नाव आर. आर. कॉलेज, खरंच काय मंतरलेले दिवस असतात नाही हे महाविद्यालयीन दिवस.

'स्वप्नात गुंगत जाणे, वाटेत भेटत जाणे

गाण्यात हृदय झुरायचे, झोपाळ्यावाचून झुलायचे

दिवस तुझे हे फुलायचे'

हो असेच असतात महाविद्यालयीन जीवनातील दिवस जादूने भारलेले. अजून आठवतो तो महाविद्यालयाचा पहिला दिवस. ॲडमिशनसाठी त्या लागलेल्या लांबच लांब रांगा. पहिल्या दिवसाचे ते बावरलेपण, सिनिअर्सची वाटणारी भिती. पण ही भिती हळूहळू संपत गेली. सुरुवातीला जेव्हा लायब्ररी पहायचे तेव्हा भिती वाटायची. अहो लायब्ररी कार्ड काढताना दिल्या जाणाऱ्या सूचनांनी घाम फुटायचा. लायब्ररी म्हणजे खजिन्याची पेटी आणि लायब्ररीयन व इतर शिपाई म्हणजे त्या खजिन्याच्या पेटीला कडक पहारा देणारे रखवालदार वाटायचे. स्टडीरुम मधील ती दहशत युक्त शांततेची गंमत वाटायची पण पुढे जसजशा लायब्ररीच्या फेऱ्या वाढू लागल्या तसतशी भिती संपून गेली. आणि कधी आम्ही स्टडीरुम व लायब्ररीमध्ये पडीक झालो हे कळलेच नाही.

होय पुढे आठवत राहतील हे दिवस. आठवत राहतील ती वेगवेगळी लेक्चर्स शिक्षकांच्या शिकवण्याचे रटाळ, असे अर्थशास्त्राचे सिद्धांत, गोष्टीप्रमाणे रंजक वाटायचे तर कधीकधी इतके रटाळ व्हायचे व शेवटी घंटेकडे कान लावून बसायला लागायचे. आठवत राहिलं ती कट्ट्यावरची गप्पांची मैफिल, कॅन्टिनचा चहा नाष्टा इथेच भेटतात नवनवीन गोष्टी, जीवाभावाच्या मैत्रिण, मित्र, गॅदरिंग ट्रॅडिशनल डे, साडी डे, शिक्षक दिन, ही यादी लांबतच जाते. एवढे तर जादूगाराच्या पोतडीतूनही निघणार नाही.

इथेच भेटते पहिले प्रेम. कुणाकुणाला दुसरे, तिसरे, चौथेही... मग वर्षभर प्रेमात पडणे, उठणे चालत राहते. येथेच महाविद्यालयीन जीवनात तुम्ही अनुभवू शकता केवळ एका नजरेने भर दुपारची पौर्णिमेची रात्र. त्याला-तिला एक नजर पाहण्यासाठी पाहिलेली तासंतास वाट व नजरेला नजर मिळताच इतर कुणाला काहीच कळत नाही पण तुम्ही मात्र चांदण्यात न्हाऊ शकता. अहो हे महाविद्यालयीन दिवस असतातच असे! रात्र थोडी सोंगे फार. एकापेक्षा एक रंजक गोष्टी असतात इथे. म्हणूनच म्हणतात ना! आर आर कॉलेज के सुनहरे दिन

वापस मुडकर कभी ना आयेंगे।

Lets face it my friend

कल हम जुदा हो जायेंगे।।

नामुमकीन है भूल जाना

पाँच बरस की ये जिंदगानी

भर आयेगा तुम्हारा जिया

जब आयेगी याद पुरानी'



खरेच मित्रांनो, हे असेच असतात महाविद्यालयीन दिवस जीवनाची पुंजी जिंदगीके साथ भी जिंदगीके बाद भी' आयुष्य भरभरून जगायला शिकवणारे त्यामुळे मित्रांनो भरभरून या आठवणी पोतडीमध्ये शिदोरी आहेत त्या या जीवनप्रवासाच्या.

या कॉलेजची इमारत व परिसराची

सुद्धा कमाल आहे. अहो अगदी सकाळी हा परिसर म्हणजे पुजेला बसलेल्या आजीप्रमाणे प्रसन्न वाटायला गूढ शांतता असते इथे अकराबारा वाजता. गजबजलेला परिसर पाहता नवतारुण्याचा फुललेला जोश दिसतो व दुपारी पहाल तर अगदी ध्यानस्थ बसलेल्या योग्याची भावमुद्रा धीरगंभीर असतो हा परिसर. परीक्षा जवळ आल्यावर कॉलेजचे वातावरण बदलते कट्टा सुनासुना वाटतो. व लायब्ररी स्टडीरूम भरू लागतात. नोट्सची जमवाजमव करण्यासाठी धावपळ सुरू होते. अशी तयारी करून धडधडत्या अंतःकरणाने परीक्षा दिली जाते.

यावर्षी या क्रमाने सारे काही होईल पण नंतर पुन्हा कधी सकाळी थंडीत आठ वाजता तयार होऊन गडबडीने कॉलेजला येऊन लेक्चर अटेंड करता येणार नाही. हा लेख जेव्हा तुमच्या हातात येईल तेव्हा हे वर्ष संपलेलं असेल. व आपण वेगवेगळ्या वाटेने निघून गेलेलो असू. त्यामुळे जाताजाता एवढेच सांगते मित्रांनो, 'जगा भरभरून हे मयुरपंखी दिवस.'

'हर पल यहाँ जी भर के जियो
जो है समा कल हो ना हो'

## नाटक

नाटक हे नाटकच असतं
प्रेक्षकांनी ते पहायचं असतं
अभिनेत्यांनी ते रंगवायचं असतं
जीवनातलं दुःख विसरून
दुसऱ्याचं मनोरंजन करायचं असतं
नाटक संपल्यावर मात्र
पडद्याआड व्हायचं असतं
अन् स्वतःच दुःख मात्र
चार भिंती आडचं
दफन करायचं असतं
कारण ते सत्य असतं
पण आयुष्य हे एक नाटकच असतं
जिथे अनेक कलाकार भेटतात
अन् स्वतःचं कर्तृत्व गाजवतात.



– **कु. चैतन्या बिरासदार,** बी. ए. भाग २

# श्रावण मी...



रोज तुझ्या डोळ्यात नव्याने रिमझिमणारा श्रावण मी
आठवणींच्या गंधफुलांनी दरवळणारा श्रावण मी
हिरवळलेल्या वाटेवरती
एकटीच तू फिरताना
पाऊस ओल्या गवतावरचे
थेंब टपोरे टिपताना
तुझ्या मनीच्या हिरव्या रानी, भिरभिरणारा श्रावण मी
आठवणींच्या गंध फुलांनी दरवळणारा श्रावण मी
फांदीवरल्या झोक्यावरती
उंच उंच तू झुलताना
मेंदी भरला हात हळदीनी
हळूच तू पुढे तू करताना
तुझ्या गुलाबी ओठांवरती, थरथरणारा श्रावण मी
आठवणींच्या गंधफुलांनी दरवळणारा श्रावण मी
पावसातले दिवस आपुले
शोधतेस तू आज जिथे
तुझे आणि माझे गीत कालचे
ऐकतेस तू आज तिथे
तिथेच कुठेतरी अजूनही मोहरणारा श्रावण मी
आठवणींच्या गंधफुलांनी दरवळणारा श्रावण मी.

**- कु. महानंदा गंगाराम माळी,**
बी. ए. भाग ३



# शेतकरी (एकांकिका)

**कु. जास्वंदी आनंदा व्हनखंडे,** बी. ए. भाग - ३

## दृश्य १

पडदा पडतो. एक अधिकारी मुलगी आपल्या बापाला दिलेले वचन पूर्ण करते. त्यावेळेस शाळेत बोलवलेल्या विद्यार्थ्यांसमोर आपल्याला मिळालेली समाजाची वागणूक आणि त्या परिस्थितीतून स्वतःला सावरून या पदापर्यंत पोहचली ते दाहक वास्तव तिचा भाऊ सादर करतो.

**बापू** :- कुठं पोरं दिसनासं झालंय, गेलं असल माळावर किरकिट खेळायला.

रागाने म्हणतो.

**लता** :- बापू काय काम होतं का?

**रकमा** :- काय झालं तुमास्नी येवढं गळा फाडून ओरडाया.

**म्हातारी सासू** :- आता माझा जीव पूर्ण थकलाया शांत खाटेवर पडून राहते.

**बापू** :- तुझ्या लाडानंच पोरं लय बिगडाय लागलंय. एक दिवस घे त्याला डोस्क्यावर बसवून.

**चंदू** :- किरकिट खेळ लय भारी. आज मजाच मजा आली.

**सख्या** :- अरं चंद्या तुझा बा तुझ्यासाठी लई काम करतुया अन तू असं किरकिट खेळायला येतूयास.

**चंदू** :- तू जा की मग माझ्या बाला मदत कराया. चल आता घराकडे जावू.

(घराकडे जाताना सावकार दिसतो.)

**सख्या** :- तो बघ सावकार कसा बघतोय.

**चंदू** :- बघू देत त्याला एक दिवस दाखव तूच.

**सावकार** :- याच्या बानं माझ्याकडून कर्ज घेतलंय आन् आता देयाचं नावच घेत नाही.

**राम्या** :- सावकार तुमी त्याला कर्ज दिलच कशापाय.

**सावकार** :- अरं त्याची जमीन म्हणजे सोन्याचं अंडं देणारी कोंबडी हाय.

**राम्या** :- सावकार ते म्हणजे काय?

**सावकार** :- अरं त्याच्या जमिनीला जर पाणी मिळालं तर सोनं उगवतंय. या वरसाचा दुष्काळ म्हणूनच त्यास मी कर्ज दिलया.

दोघं जाता जाता बोलतात.

**चंदू** :- ते बघ सावकार कसं बोलत चाललंय.

**सख्या** :- चंदू चल घराकडं चल आता.

**चंदू** :- माय बापू कुठं गेल्यात गं?

**रकमा** :- तुझा बा लय रागावलाय बघ जा त्यास्नी मदत करायला शेतावर.

**चंदू** :- माय मी शाळंला जाणार हाय मॅट्रिकची परीक्षा देणार हाय.

**रकमा** :- समदं माहीत हाय रं पोरा पर या वरसाचा दुष्काळ आन त्यात आपल्या जमीनीस पाणी पण न्हाय. सावकाराकडून कर्ज घेतलंय बघ.

**चंदू** :- माय तू काय बी काळजी करू नगस मी हाय.मी बघीन संमदं.

**लता** :- दादा मी पण शाळंला चाललीया.

**चंदू** :- शाळेत जाऊन अभ्यास लय करायचा आणि पहिला नंबर आणायचा बघ. मला माहीत हाय तू लय हुशार हाय ते बाई म्हणत होत्या.

**रकमा** :- तुमी जावा शाळंला.

## दृश्य २ (शाळेतील शिक्षण)

**लता** :- दादा मी जाती माझ्या वर्गात

**चंदू** :- नीट लक्ष देवून शिक.

**लता** :- बाई गणित देतात ते लता लिहून घेते.

**बाई** :- या गणिताचं उत्तर बरोबर सोडवून दाखवायचं

**लता** :- सर्वात अगोदर बाईला गणिताचं उत्तर दाखवते. बरोबर.

**बाई** :- लताचं टाळ्या वाजवून अभिनंदन करतात. शाळेत विविध कार्यक्रम असतात.

**लता** :- आज मी भाषणात भाग घेणार.

**गीता** :- आज आपल्या शाळेत भाषणाचे स्पर्धक आल्यात.



कुणीतरी येऊन बदल घडवतील याची वाट बघत बसण्यापेक्षा स्वतःच होणाऱ्या बदलाचा भाग व्हा. - बराक ओबामा

त्यात आपल्या वर्गातील लता पण आहे.

**लता** :- मी पहिलं बक्षीस मिळवीन. माझा बापू आमच्यासाठी शेतात लय कष्ट करतोय. भाषणात लताचा नंबर येतो.

**चंदू** :- लता छान केलं बघ भाषण

**लता** :- आमच्या बाईंनी मला आशीर्वाद दिला. आपल्याबापूचं कष्ट बघून मला लय दुःख होतयं. धाडसानं भाषण केलं आणि नंबर मिळवला बघ पहिला.

**चंदू** :- आज म्या लय खुष आहे तुझा भाषणात नंबर आल्यामुळं

**लता** :- चल शाळा सुटलीय आता घरी जाऊ चल.

**चंदू** :- आता परीक्षा जवळ आल्यात. परीक्षा झाली की पुढील शिक्षणासाठी तालुक्याला जाणार. लय शिकीन आणि तुला पण शिकवीन.

**लता** :- दादा आपण कसं शिकायचं आपल्याकडं पैसे पण नाहीत.

**चंदू** :- आमच्या सरांनी सांगितलंय चांगली मार्क मिळाली की आपल्याला प्रवेश मिळतूया म्हणून.

**लता** :- दादा मला पण लय शिकायचं आहे.

**चंदू** :- तू पण मन लावून अभ्यास कर बघ. माय-बापूची दुःख पाहून मला पण लय शिकायचं आहे बघ.

परीक्षा देवून दोघंही चांगली मार्क मिळतात.

## दृश्य ३

**चंदू** :- माय मी पास झालो बघ. बापू मी पास झालो चांगली मार्क पडल्याती.

**रकमा** :- मी माझ्या पोराला शिकवणार. त्याच्या शिक्षणासाठी माझं डोरलं गहाण ठेवून सावकाराकडनं पैसं आण.

**चंदू** :- प्रवेश फॉर्म घेतो अन् भरून देतो. दुसऱ्या दिवशी मेरिट लिस्ट लागते.

**बापू** :- पोरा एवढ्या मोठ्या शाळतलं आपल्याला काय बी माहीत न्हाय बघ.

**चंदू** :- बापू एवढी कशाला काळजी करताय.

**बापू** :- तसं न्हाय रं पोरा तुला माहीत न्हाय. तुझ्या मायनं तुझ्या शिक्षणासाठी तिचं डोरलं गहान ठेवलंय. तुला शिकावायचं म्हंतेय.

दोघेही मिळून सूचना फलकाजवळ जातात.

**चंदू** :- सर माझं या यादीमध्ये नाव नाही.

**सर** :- तू ग्रामीण भागातला आहेस. तुमची एवढी ऐपत आहे का? एवढं पैसे भरायची. वैद्यकीय कॉलेज आहे हे. मार्क असून चालत नाही. पैसे पाहिजेत पैसे!

हुशार असूनही त्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळत नाही.

**बापू** :- बघ पोरा आता काय करायचं. आम्हासनी काय बी कळत नाही. तुमच्या या शिक्षणातलं पण एवढं वाटतं तू शिकून मोठं व्हावं सोताच्या पायावर उभं राहावं. दोघेही रस्त्यानं चालत बोलत जातात.

**एक सुजाण नागरिक** :- तुम्ही मोठ्यानं बोलत चालला आहात म्हणून मला तुमचं बोलणं समजतया. पण काय करणार या मोठ्या कॉलेजमध्ये असंच असतंय. पैसे भरूनच काम केलं जात.

**चंदू** :- मग सामान्य विद्यार्थ्यांचं काय? त्यानं शिकायचं न्हाय होय. लोकशाही असूनही आपल्या देशात काय चाललंय समजत न्हाय.

**एक सुजाण नागरिक** :- पोरा मला माहीत आहे शिक्षण असेल तर आपल्या देशाची लोकशाही मजबूत होणार आहे. प्रत्येक नागरिक हा लोकशाही अवलंबून देशाचा विकास करील. एस.टी.बस येते. दोघेही एस. टी. त बसून गावी परत जातात.

**चंदू** :- बापू मी आपल्या शेतात तुमास्नी मदत करीन आणि आपल्या लताला शिकविन.

**बापू** :- पोरा तुला जे समजते ते कर. दोघेही शेतात जातात. तोवर सावकार येतो.

## दृश्य ४

सावकार गावातील लोकांना घेऊन शेतात येतो. कर्जाचे बोलणे सर्वांच्या समोर मांडतो.

**सावकार** :- बापू तू कर्ज घेऊन किती वरीस होत आल्यात. आणि कर्जाचं व्याज बी वाढत चाललंय.

**बापू** :- सावकार या वरसाचा दुस्काळ तुमी बघताय ना! आणि पाऊस बी न्हाय एवढी परिस्थिती न्हाय की तुमचं व्याजासकट कर्ज फेडायची.

**सावकार** :- बापू किती दिवस गप्प बसायचं सांग. तुझी ही जमीन देऊन टाक.

**चंदू** :- बापू तू बाजूला हो. या सावकाराला मी बघतू आमची जमीन या सावकाराला पायजे हाय? रागाने सावकाराच्या अंगावर धावून जातो. मोठ्यानं भांडण होतं. हाणामारी होते.

**सावकार** :- पोराला माराया, लय दादागिरी करायला हाय. सावकाराची माणसं त्याला मारतात.

**चंदू** :- दगड उचलतो आणि सावकाराच्या डोक्याला मारतो. दगड लागून सावकार बाजूला पडतो. सावकाराची माणसं पोलिस पाटलाला बोलावतात.

**पोलीस पाटील** :- हे पोर कुणाचं हाय. समजत न्हाय का कोणाच्या बरोबर लढतंय.

श्रीमंत सावकाराबरोबर चंदूला पकडून घेऊन जातात. पोलीस कस्टडीत टाकून खूप मार देतात.

**सावकार** :- पोलीसाला पैसं देवून मार द्या असं सांगतो.

**लता** :- दादा काय केलंस तू हे. बापू बी आजारी पडल्याती. आता कसं करायचं आम्ही?

बापू गळफास घेऊन आत्महत्या करतो.

**चंदू** :- लता मला माहीत आहे. तू लय हुशार आहेस. शिकून मोठी हो. बापूचं स्वप्नं होतं की पोरांनी शिकावं स्वताच्या पायावर उभं रहावं.

**लता** :- दादा मला माहीत आहे हे सगळं त्या सावकारानंच केलंय.

**रकमा** :- आपली जमीन मिळवण्यापायी सावकार असं करू लागलाय. आपण जमीन देणार न्हाय म्हणून गावातील माणसं घेऊन आलाया. तू आपली जमीन कर्जापायी जाईल म्हणून त्याला तू मारलंस सगळ्यांनी पाहिलीय ही घटना. चंदू सावकाराला समजावण्याचा प्रयत्न करतो पण सावकार घेतलेलं कर्ज हे व्याजासकट परत मागतोय.

**चंदू** :- मायला सावरं लता. बारक्या भावाना शिकव.

**गणेश** :- दादा काळजी करू नगस.

**चंदू** :- स्वतःच्या पायावर उभं रहा आधार दे सगळ्यांना सावकाराला मारल्यामुळे चंदूला शिक्षा होते.

**रकमा** :- घरात म्हातारी सासू हाय. अन शाळेत जाणारी पोरं हायेत नवऱ्यानं दोन मुलांच्या रूपानं जी निशाणी ठेवलाय ना. कपाळाला हात लावत म्हणताय त्यांना बघायचं कसं वाढवायचं कसं आणि दिवस कसं काढायचं दिवसभर कस्ट करताय.

**सुबा** :- कशा पाय एवढी चिंता करताय. तुझी लेक लय हुशार हाय बघ. तिला शिकव.

**रकमा** :- काय करू मी काय बी समजत न्हाय बघ. आलेला दिवस गोड मानायचा. कामं म्हाताऱ्या सासूचं, मुलांचं करता करता दम निघतोय नुसता. सम ह्यास्नी जगविणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबावर ह्यो दिवस बघाय मिळतोय. अनकसलं काय आलंय. असं म्हणत कामावरून घरी येते.

**लता** :- माय थोडं पाणी पी बघ काम करून लय थकलीय बघ तू.

**रकमा** :- सावकाराचं कर्ज तुझ्या बापानं आत्महत्या केली बघ पोरी. शेती आपलं जगायचं साधन. कपाळाला हात लावत शेतीच गहान. तवा काय करायचं? हा प्रश्न डोस्क्यात घुमतोय बघ. तवा तूच शिकून काय तरी कर बघ पोरी.

**लता** :- काय बी काळजी करू नगस तू. मी अधिकारी होऊन समाजाला या सावकाराच्या जाळ्यातून बाहेर काढीन बघ.

**आवाज** :- लता स्वतःला सावरत आवाज करत बोलते. शेतकऱ्यांच्या कुटुंबाची परिस्थिती ही अशीच राहणार का? शेतकरी आपला जीव देवून निघून जातो. तेव्हा त्या शेतीचं काय होतं? शेतकऱ्यांचं कुटुंब कसं जगेल? असा प्रश्न समाजाला विचारते.

लोकशाहीची अंमलबजावणी, सावकाराच्या जाळ्यात अडकलेले देशातले कितीतरी ग्रामीण शेतकरी या कर्जात होरपळत आहेत. जो कुणी ही व्यवस्था मोडीत काढण्याचा प्रयत्न करतो. त्या शेतकऱ्याच्या नरडीचा घोट घेतला जातो. पण काही तरी लता ही समाजातील अनेक मुलींची प्रेरणा आहे. शिक्षणाचा आधार घेऊन ती समाज बदलवते. तिनं टाकलेलं हे पाऊल भारताच्या संविधानाकडे नेणारं आहे. सावकारी पाश, मोडून सामाजिक आर्थिक न्यायाकडे यशाकडे नेणारे आहे.

# उन्हाळ्यातील दिवस (माहितीपर लेख)

**कु. सुप्रिया यादव**, बी. ए. भाग - २



साधारणतः एप्रिल-मे मध्ये परीक्षा संपल्याल्या असायच्या आणि शाळा नावाच्या रोजच्या कटकटीपासून काही दिवसांसाठी का होईना पण सुट्टी मिळालेली असायची. शाळेला सुट्टी जरी असली तरी मस्ती, खोड्या आणि कुणाच्या तरी कुरापती काढायला मात्र नाही.

उन्हाळ्यातील दिवसांची सुरुवात तशी मोरांच्या आवाजानं व्हायची. मग तिथनं पुढं दिनक्रम ठरल्याप्रमाणे चालायचा, सकाळचा चहा पिऊन झाल्यावर घरात थांबुशीच वाटायचं नाही, कारण त्यानंतर आईची कामाची लिस्ट चालू व्हायची. ती संपायच्या आत घरातून पोबारा करायला लागायचा. तसं नाही केलं तर त्या लिस्टमधलं ते नकोसं वाटणारं पहिलं-वहिलं काम करायला लागायचं. ते म्हणजे गुरांच्या गोठ्यातील शेण काढणं. आम्हा सातही भावंडांना ते आवडायचं नाही. कारण एवढ्या सुंदर सकाळी सकाळी उग्र वास येणाऱ्या गोठ्यात जाऊन शेण काढणं म्हणजे जीवावर यायचं. पण मला मात्र हे काम काय घरातल्या सगळ्याच कामांचा कंटाळा म्हणून मी घरातून लवकरात लवकर निसटण्याचा प्रयत्न करी, पण आमची काकू आम्ही जेवढ्या दबक्या पावलांनी परसदाराकडे निघू तेव्हा ती नेमका मागून आवाज देई आणि रात्रीची भांडी घासायला सांगत. पण ती मागं वळली की आम्ही इकडं पशार. पण ती कधी कधी हाताला धरून नेई. तेव्हा मात्र नाक मुरडत नाईलाजाने जावं लागे.

माझ्यासारख्याच माझ्या मित्र मैत्रिणी ऐतखाऊ. मी आणि माझी चुलत सहा भावंडं आणि शेजारपाजारची चार-पाच पोरं-पोरी मिळून आमचा बारा-तेरा जणांचा घोळकाच तयार व्हायचा. मग आम्ही रोज सकाळी वेगवेगळी ठिकाणं खेळण्यासाठी निवडत. त्या ठिकाणीच आमचा हा घोळका जमे. आदल्या दिवशी ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी प्रत्येकजण कसाबसा घरातल्यांच्या हातावर तुरी देऊन खेळायला यायचा. ते परत पोटात भुकेची चाहूल लागल्यावरच परत. घराचं तोंड बघायचा.

मग सगळेजण जमल्यावर आम्ही बारा-तेरा पोरांचा घोळका कोणाच्या ना कोणाच्या वाळवणांवर दरोडा टाकायचो आणि ज्या दिवशी पोरं सांगायची, 'आईनं आज भातुड्या घातल्याती, मग काय त्या दिवशी सकाळचा नाश्ता आणि बाराचं जेवणं त्या पाराच्या आईनं घातलेल्या भातुड्यांवर ताव मारून व्हायचं. ज्याच्या घरी हा दरोडा टाकायला जायचं मग सगळ्यात आदी त्यालाच पुढं करायचं. म्हणजे पकडलो गेलो तर तोच आदी धावायचा आणि मग बाकी समदे सुसाट पळून जायचे. पण प्रत्येक वेळी मनाप्रमाणे घडायचंच असं नाही. कधी कधी सगळेच पकडले जायचो. पण आमच्यापेक्षा मोठी पोरं, सारी, नाऱ्या गण्या आम्हाला सांगायची, ''मास्तरानं सांगितलं या साळतं कितीही अपयश आलं तर हार मानून खचून जायचं नाही. प्रयत्न करीत राहायचं. शेवटी प्रयत्नांती परमेश्वर.' मग आम्ही तोच उपदेश गृहीत मानून घेत आणि दुसऱ्या दिवशीच्या भातुड्याच्या दरोड्यासाठी तयार होत. पण एकदा बाळ्याच्या घरी भातुड्यावर ताव मारायच्या आतच बाळ्याची आयं आली अन् आमच्या सगळ्यांची ताटी-किरडी तिनं तिथचं मोडली, घरी गेल्यावर वेगळी मोडली ती तर सोडाच...

भातुड्याचा कार्यक्रम आटोपल्यावर आमचा मोर्चा वळायचा तो मळगीतल्या विहिरीकडं. दुपारच्या रकरकत्या उन्हात पोहायलाही मज्जा वाटायची. उन्हातनं हिंडल्यामुळं गरम झालेलं डोकं शांत आणि गार व्हायचं, मात्र कपडे ओली व्हायची. ती वाळवायला पुन्हा उन्हात उभं राहायचं. कारण आमराई तिकडे खुणावत असे तर इकडे पोटातले कावळे आवासून ओरडायचे. तर काहींनी इव्हाना आत्महत्या केलेली असायची. मळगीतल्या विहिरीच्या काहीच अंतरावर आमराई होती. एक-दोन तास पाहून झालं की पुढची सगळ्यात कठीण कामगिरी असायची आमराईत घुसायची ही कामगिरी पोरांना खूपच कठीण वाटायची. कारण एकीकडे आमराईतल्या कच्च्या कैऱ्या झाडाला लटकलेल्या दिसायच्या. एकतरी मिळवण्यासाठी प्रत्येकाची धडपड 'पाडाचा आंबा' हाती लागला तर 'सोने पे सुहागा' असायचा पोरांसाठी. मात्र दुसरीकडे आमराईचा मालक एकाबी पोराला आमराईत पाय ठेवू द्यायचा नाही. आणि कुणी ठेवलाच तर त्याला झोडपून काढायचा, म्हणून सगळ्यांनी मिळून त्यांचं 'झोडप्या' या नावानिशी बारसं घातलं. या झोडप्याला चुकवून आमराईत घुसण्यासाठी प्रत्येकजण शक्कल लढवत. आज आमराईत घुसायचं कसं. हाच मोठा प्रश्न सगळ्यांपुढे असायचा. काहीच नाही सुचलं तर नेहमीचा मार्ग असायचाच. जास्त काही नाही तर थोड काहीतरी हाती लागायचं.

नेहमीप्रमाणं मुद्दामहूनच झोडप्या जिथं बसलेला असायचा.

त्याच्या पुढनंच एकादोघांनी जायचं. पोरांना बघून झोडप्या पोरांना बोलावणार हे शंभर टक्के पोरांना माहीत. त्यामुळं आमच्यातले एक-दोघं त्याच्या पुढनं जात, झोडप्या त्यांना बोलावत ती पोरं त्याला बोलण्यात गुंतवित तोवर बाकीची पोरं इकडं कैऱ्या घेऊन पशार झालेली असायची. झोडप्या सोबत बोलणारी पोरही लगेच थोड्यावेळानं येत. कारण कैऱ्या पोटात कधी जातात असं त्यांना होत एवढ्या मेहनतीचं गोडं नाही पण आंबट फळ आम्हाला जरूर मिळत असत.

पण एकदा आमराईत घुसल्यावर आमच्या सगळ्यांचीच चांगलीच फजिती झाली. तेव्हापासून आमच्या घोळक्यातली एक बी पोरगं किंवा पोरगी त्या आमराईकडं फिरकली न्हाईत. त्याचं झालं असं, पोरं जेव्हा, आमराईत घुसायची आणि हा झोडप्या त्यांना पकडायचा आणि भुताची भिती दाखवायचा पण झोडप्याच्या या भुताला एक बी पोरगं घाबरत नसायचं. म्हणून झोडप्यानं एक युक्ती केली. ती अशी की चार-पाच दिवस तो आमराईकडं फिरकलाच नाही. पोरांना मनसोक्त आंबे-कैऱ्या खाऊ दिल्या नंतर मात्र चांगलीच खोड मोडली. आम्ही नेहमीप्रमाणं जरा जास्तच आनंदात (झोडप्या नसणार म्हणून) होतो. आमच्या माहितीनुसार झोडप्या गावी गेल्यामुळे आमराईत जाण्यापासून रोखणार कोणच नव्हतं. मी आणि हेमीनं तर आंब्याचं लोणचं करायचं म्हणून त्या काळातल्या अस्सल ग्रामीण भाषेत सांगायचं. या 'बेगडाची चकाकणारी पिशवी' आणली होती. अशातच गप्पा-गोष्टी करत आमचं टोळकं आमराईत पोहचलं. की लगेच कैऱ्या तोडता तोडता खाणं चालू झालं. प्रत्येकजण आनंदात होता. कारण या आधी इतकं सहजपणे आमराईत यायला आणि बसायलाही मिळत नसे. थोडा वेळ गेल्यावर गण्याच्या शर्टाकडं नंदीचं लक्ष गेलं तर मागनं शर्ट पार रक्तानं माखलेला होता बघता क्षणी ती जोरात किंचाळली. आवाज ऐकून सारेजण काय झालं बघण्यासाठी जमा झाले. गण्याचा लालभडक शर्ट पाहून प्रत्येकजण आपापले मतप्रदर्शन करत होता. कुणी म्हणायचं गण्याच्या पाठीलाच लागलय. कुणी म्हणायचं, पडला असल. झाडाची फांदी लागली असल, तर कुणी काय. पण जेव्हा अन्या म्हणाला, 'भुताचं रगात तर नसल?' तेव्हा मात्र सगळ्यांच्या अंगावर काटा आला. पण सुन्यानं मात्र हे अमान्य केलं आणि सगळ्यांना धीर दिला. पोर



पुन्हा भितभित का होईना पण आपल्या कामाला लागली. तेवढ्यात एका बाईचा आवाज आला, 'नमस्कार, आपलं स्वागत आहे' एकदा नव्हे दोनतीन वेळा या एकाच बाईचा आवाज आला आणि ती कायबाय बोलत होती. ते आम्हा पोरांना समजलंच नाही, समजायला आमची डोकीच ठिकाणावर नव्हती. आवाज ऐकून सगळीच पोरं गांगारली होती, तोंडातून शब्द फुटत नव्हते, सर्व अंगावर काटे आल्याचा भास होत होता. मी आणि हेमीनं नेलेल्या बेगडाच्या पिशव्या वाजत होत्या. त्यामुळे एक वेगळेच भितीचे वातावरण तयार झाले. आता मात्र आम्ही सगळेजण एका ठिकाणी जमा झालो. एकदा एकमेकांकडे बघितलं, आणि जे सुसाट पळत सुटलो. ते गावातल्या मारुतीच्या कठड्यापर्यंत अगदी नॉनस्टॉप. गोळा केलेल्या कैऱ्या काहीजण तिथेच सोडून आले, तर काहीजण भुताचा आवाज ऐकून स्वतःलाच सांभाळणं मुश्किल झालं, त्यामुळे कैऱ्या तिथच राहिल्या. सांगू लागले, गावात आल्यावर कटड्यावर बसलेल्या रामानं विचारलं, ''पोरानु एवढं जोरात पळाय काय झालं, माग लागल्यासारखं पळाय, इकडं या बगु.'' तेव्हा आम्ही सगळे जण त्याच्याकडे गेलो आणि झाला प्रकार सांगितला. आगदी त्या क्षणापासून आमराईत पुन्हा एका नव्या भुताचा, कुणाच्या मते चेटकिणीचा जन्म झाला. गावभर बातमी पसरली. आम्ही पोरांनी मात्र त्यानंतर उन्हाळ्यातल्या सुट्ट्या घरात काम करण्यातच घालवल्या. आमराईच नाव सुद्धा काढलं नाही की, तिथून जाण्याचा प्रसंग आला तरी लांबून वेढा मारून जाऊ पण आमराईपासून कधी जात नसू.

पण इकडं आमराईचा मालक झोडप्या पोरांना कसं हुसकावलं याच्या बढाया, मारत हिंडत होता. गण्याच्या शर्टावरचं रक्त नसून कुंकवाचं पाणी होतं ते त्यानेच झाडाच्या बुंध्याच्या मागं लपून वतलं होतं आणि बाईचा सारखा येणारा आवाज ज्याला आम्ही सगळे घाबरलो होतो. तेव्हा आम्हाला काही दिवसांनी कळलं तो आवाज रेडिओ वरल्या बाईचा होता. आणि तेव्हाच कळलं रेडिओ म्हणजे काय असतं.

ही आम्हाला माहीत नसणारी पडद्यामागची हकीगत झोडप्या माझ्या वडिलांना रंगवून सांगत होता.

आमराईतल्या भुताटण्यानंतर आमराईकडे परत कधीच पावले वळली नाहीत. पण उन्हाळ्यातल्या दिवसांमधली मस्ती, मज्जा, खोड्या कधीच कमी झाल्या नाहीत. लहानपणातले ते क्षण खरच अविस्मरणीय आणि कधीही न पुसण्यासाठी मनात घर करून बसले होते आणि कायम राहतील.

# मला आवडलेला संशोधक : निकोला टेस्ला (व्यक्तिचित्र)

**कु. पूजा मल्लाप्पा कोळी**, बी. एस्सी. भाग - ३



मित्रांनो विचार करा जर जीवनात वीज नसती तर काय झाले असते या चालू वर्तमानकाळात विजेशिवाय जगणे म्हणजे कठीणच आहे. कारण आपल्या दैनंदिन जीवनात आपण विजेवरील उपकरणांवर फारच अवलंबून आहोत. परंतु आजपासून जवळजवळ १५० वर्षांपूर्वी विजेचा ठावठिकाणाही नव्हता. त्यावेळी एका महान वैज्ञानिकाने अशी कमाल करून दाखवली की ज्यामुळे लोक आजही त्याचे फार ऋणी आहेत. निकोला टेस्ला असे या महान संशोधकाचे नाव. विजेचा शोध लावून त्याने वैज्ञानिक जगतात खूप मोठी क्रांती घडवून आणली.

**टेस्लाचे बालपण व शैक्षणिक वर्ष -**

निकोला टेस्ला हा एक सर्बियाई - अमेरिकन संशोधक, भौतिकशास्त्रज्ञ व विद्युत अभियंता होता. टेस्लाचा जन्म १० जुलै १८५६ रोजी ऑस्ट्रीयन राष्ट्रातील क्रोअशिया मध्ये झाला होता. विजेचा शोध लावण्यासाठी त्याला त्याच्या मातोश्री डिजुका मेंडिस यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या आईने मोकळ्या वेळेत घरातील काही छोटी मोठी उपकरणेही बनवली होती. टेस्लाचे वडील मिलुटीन टेस्ला हे धर्मगुरू होते. टेस्लाचे संपूर्ण शिक्षण हे 'रियलस्कूल कार्लस्टड पॉलिटिकल इन्स्टीट्यूट', ग्राज, ऑस्ट्रिया आणि 'प्राग युनिव्हर्सिटी' मध्ये झाले.

शालेय जीवनात टेस्ला त्याच्या गणित विषयाच्या शिक्षकामुळे खूपच प्रभावित झाला. टेस्ला समाकलन (Integration) च्या प्रश्नांना चुटकीसरशी सोडवण्यात तरबेज होता. त्याच्या शिक्षकांना त्याच्यावर विश्वासच नव्हता, कारण त्याने चार वर्षांचा अभ्यासक्रम हा तीन वर्षांतच पूर्ण केला होता. सन १८७५ मध्ये त्याने ऑस्ट्रीयन पॉलिटेक्निक द्वारे आयोजित एकूण नऊ परिक्षांमध्ये इतरांच्या तुलनेत सर्वोत्तम गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. सन १८९४ मध्ये त्याने कोलंबिया व याले विद्यापिठातर्फे देण्यात येणारी डॉक्टरेट पदवी संपादन केली.

**टेस्लाचे संशोधन -**

सन १८८१ मध्ये टेस्लाने बुडापेस्ट मधील 'बुडापेस्ट टेलीफोन एक्स्चेंज' या टेलीग्राफ कंपनीत प्रमुख विद्युत अभियंता या पदावर नोकरी केली. या पदावर असताना त्याने केंद्रीय संचार प्रणालीवर आधारित उपकरणांमध्ये अनेक सुधारणा केल्या आणि टेलीफोन एम्प्लीफायरला एका नव्या रुपात सादर केले.

टेस्ला विज्ञानातील कठीण गोष्टींना सहज आत्मसात करू शकत होता. पण सामाजिक व्यवहारापासून चार हात लांबच राहायचा. म्हणूनच टेस्ला जीवनात ती उंची गाठू शकला नाही किंवा ते यश आत्मसात करू शकला नाही जे एडिसनने संपादन केले. ज्यावेळी अमेरिकेत एडीसनच्या DC विद्युत वितरण प्रणालीची व्यवस्था सुरू होती. त्यावेळी टेस्लाने DC प्रणालीतील कमतरतेकडे लोकांचे लक्ष वेधले आणि विद्युत वितरण व्यवस्था सुरू करण्यासाठी प्रयत्न चालविले. या प्रात्यक्षिकाद्वारे टेस्लाने AC विद्युत प्रणालीचे फायदे लोकांना पटवून दिले जसे विद्युत प्रणालीमधील विद्युतदाब ट्रान्सफॉर्मर द्वारे वाढवून दूर अंतरापर्यंत पोचवू शकतो. तसेच प्रणालीवर चालणाऱ्या मोटार व इतर विद्युत उपकरणांमध्ये कमी वीज खर्च होते.

सन १८८७ मध्ये टेस्लाने प्रत्यावर्ती धारा (AC प्रणाली) यावर चालणारी इंडक्शन मोटार बनवली आणि या प्रयोगाने टेस्लासाठी यशाचे सगळे मार्ग मोकळे करून दिले. त्यानंतर सन १८९४ मध्ये टेस्लाने डॉक्टरेट पदवी संपादन केली. त्यानंतर सन १८४७ मध्ये वयाच्या ४२ व्या वर्षी टेस्लाने स्वतः बनवलेले 'रेडिओ नियंत्रित बोट' अमेरिकन लष्कराच्या स्वाधीन केली. टेस्लाने बनवलेली AC प्रणाली नंतर सगळ्या जगभरात वापरात आली. कारण ही प्रणाली दूर अंतरापर्यंत विद्युत संवहनासाठी उपयुक्त आहे. याशिवाय टेस्लाने काही विचित्र आणि अव्यवहारिक संकल्पनांवर आधारित संशोधनेही केली आहेत. ज्यामध्ये बेतार ऊर्जा संचार प्रणाली, मृत किरण (Death ray) इ. समावेश आहे. सन १९९७ मध्ये टेस्लाला सर्वांना हवाहवासा वाटणाऱ्या IEEE पुरस्कृत एडिसन पदकाने गौरविण्यात आले.

**टेस्ला व एडिसनमधील मतभेद -**

अमेरिकेला जाण्याची ओढ लागलेला टेस्ला सन १८८४ मध्ये अमेरिकेला गेला व त्याने जगप्रसिद्ध अविष्कारक व महान

संशोधक थॉमस एडिसनबरोबर काम करण्यास सुरूवात केली. परंतु अगदी उलट व्यक्तिमत्वाचे हे दोन महान संशोधक फार काळ एकत्र टिकले नाहीत. याला कारणही तसेच आहे. जेव्हा टेस्लाचे एडिसनसमोर त्याने बनवलेल्या मोटार व जनरेटरला अधिक प्रभावशाली बनवण्याचा प्रस्ताव ठेवला. तेव्हा एडिसनने टेस्लाला असे वचन दिले की जर तो ह्या कार्यात यशस्वी झाला तर त्याला पन्नास हजार डॉलर मिळतील. टेस्लाने स्वतः च्या मेहनतीने यश मिळवलेही पण ऐनवेळी एडिसन आपल्या वचनापासून मागे फिरला. याशिवाय त्याची टरही उडवली आणि म्हणून रागाच्या भरात टेस्लाने एडिसनची सोबत सोडून दिली.

एडिसनची कंपनी सोडल्यानंतर टेस्लाने स्वतःची कंपनी 'टेस्ला इलेक्ट्रिक लाईट अँण्ड मॅन्युफॅक्चरिंग' या नावे स्थापन केली. या कंपनीत त्याने 'डायनेमो इलेक्ट्रिक मशीन कम्युटेटर' ची स्थापना केली. त्याच्या या प्रयोगाला पेटेंटही मिळाले. संयुक्त राष्ट्र अमेरिका मधील त्याचे हे पहिले पेटेंट होते.

**टेस्लाचे खासगी दैनंदिन जीवन -**

टेस्लाचे दैनंदिन कामकाज सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत चाले. टेस्ला त्याचे रात्रीचे जेवण ठीक ८ वाजून १० मिनिटांनी करायचा व त्यानंतर परत पहाटे ३ वाजेपर्यंत टेस्ला त्याच्या कामात मग्न असायचा. टेस्ला त्याच्या शारीरिक स्वास्थ्याच्या बाबतीतही तितकाच हजरजबाबी होता. टेस्ला व्यायामासाठी दररोज ८ ते १० मैल पायी चालत असे. त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या काळात तो एकदम शाकाहारी झाला होता. दररोजच्या जेवणात तो दूध, ब्रेड, मध व भाज्यांचा रस सेवन करत असे.

टेस्ला असे सांगायचा की त्याला दोन तासांची झोप ही पुरेशी होती. तो त्याच्या कामाच्या मधल्या वेळेतही थोडीशी डुलकी घेत असे. टेस्लाने त्याच्या जीवनात अनेक पुस्तके अभ्यासली होती. टेस्लाबाबत असे सांगितले जाते की त्याची स्मरणशक्ती व बौद्धिक क्षमता खूपच विलक्षण व चांगली होती. टेस्लाला त्याच्या मायबोलीशिवाय अन्य आठ भाषांची माहिती ज्ञात होती. त्यामध्ये सर्बोक्रोशिन, चेक, इंग्रजी, फ्रेंच, जर्मनी, हंगेरियन, इटालियन व लॅटिन इ. भाषांचा समावेश होता. टेस्ला अखेरपर्यंत अविवाहितच राहिला आणि याबाबतीत त्याचे असे मत होते की त्याचे ब्रह्मचारित्वच त्याच्या यशाचे गमक आहे. टेस्लाने एका मुलाखतीत असे सांगितले आहे की लग्न न करून व ब्रह्मचारीपण स्वीकारून त्याने विज्ञानासाठी एक समर्पणच केले आहे.

टेस्लाच्या जीवनातील मध्यंतरीचा काळ -

दरम्यानच्या काळात टेस्लाने अनेक ऐतिहासिक संशोधनही केले ज्यामध्ये टेस्ला कॉईल, जनरेटर, ट्रान्सफॉर्मर याबरोबरच मोटारींसाठी लागणारी अउ विद्युत प्रणाली इ. समाविष्ट होते. केवळ अउ प्रणाली अर्थात प्रत्यावर्ती धारा यासाठी मिळालेले तब्बल ४० पदके टेस्लाकडे होती. ते पुरस्कार टेस्लाने नंतर प्रसिद्ध अभियंता व व्यापारी जॉर्ज वेस्टिंग हाऊसला विकले. कारण जॉर्ज वेस्टिंग हाऊस ते देशाला देऊ इच्छित होते. यासंदर्भातही एडिसन आणि टेस्लामध्ये खटके उडाले, परंतु यात टेस्ला यशस्वी झाला कारण त्याने बनवलेली प्रणाली ही 'सुपीरियर टेक्नॉलॉजीवर' आधारित होती.

**टेस्लाचे काही अपयशी संशोधन -**

ज्यावेळी सन १८९३ मध्ये 'शिकागो वर्ल्ड कोलंबियन एक्सपोझीशन' चे आयोजन केले गेले त्यावेळी टेस्लाने आपल्या अउ प्रणालीचे जोरदार प्रदर्शन केले. त्यानंतर लगेचच त्याला २० व्या शतकाचा Standard power system बनवले गेले. सन १८९५-९६ मध्ये टेस्लाने क्ष-किरणांचा शोध लावला जो थोर संशोधक व भौतिकशास्त्रज्ञ राँटजेन याने सन १९९६ मध्ये केलेल्या संशोधनापूर्वीचा होता. परंतु काही विद्युत उपकरणांमुळे त्याच्या प्रयोगशाळेला लागलेल्या आगीमध्ये सगळी उपकरणे जळून खाक झाली. त्यामुळे या संशोधनाचे पेटेंट त्याच्या हातातून निसटले.

सन १९०० मध्ये टेस्लाने 'एक विश्वसंचार : यंत्राची निर्मिती' या प्रकल्पावर काम करण्यास सुरुवात केली. टेस्लाच्या कारकिर्दीतील हा सर्वांत धाडसी प्रकल्प होता. टेस्लाने असे एक ना अनेक उपयुक्त शोध लावले जसे डायनेमो, इंडक्शन मोटार, रडार टेक्नॉलॉजी, क्ष-किरण, चक्रीय चुंबकीय क्षेत्र इ. समावेश होता. टेस्लाने त्याच्या एका सादरीकरणामध्ये लाखो विद्युत दाबाच्या आकाशीय विजेचा शोध लावून सर्वांना अचंबित केले. टेस्लाने त्याच्या टेलिस्कोपवर काही अज्ञात निर्देश मिळवले जे त्याच्या मते अन्य ग्रहावरून पाठवले जात होते.

टेस्लाने असा सिद्धांत मांडला की बाह्य वातावरणातून परावर्तित होणाऱ्या रेडिओ लहरी संपूर्ण जगात पाठवता येतात. या सिद्धांताला अनुसरून टेस्लाने रेडिओमध्ये वापरल्या जाणाऱ्या टेस्ला रॉडचाही शोध लावला. त्याच्या संपूर्ण जीवनात एकूण ३०० पेटेंट टेस्लाने संपादन केले.



पैसा हा माणसाचे हात किंवा पाय आहे; मग तुम्ही वापरा किंवा वापरु नका. - हेन्री फोर्ड

**टेस्लाचा अंधश्रद्धेवरील विश्वास -**

त्याकाळातील अन्य प्रसिद्ध वैज्ञानिकांप्रमाणे जसे की एडिसन विल्यम क्रूक यांच्याबरोबरच टेस्लासुद्धा काही असा मान्य गोष्टी जसे की आत्म्यांचे जग, परग्रहवासियांचे पृथ्वीवरील अस्तित्व यांवर विश्वास ठेवत होता. टेस्लाला अनेक गोष्टीं भयही वाटायचे. टेस्लाला एक लहरी संशोधक म्हणूनही संबोधले जाते. म्हणूनच असे मानले जाते की टेस्ला हा मनोविकाराने ग्रासित होता. म्हणजेच (obsessive compulsive disorder) जे त्याच्यासारख्या एकाकी संशोधकांसाठी सामान्य बाब आहे.

**टेस्लाचे शेवटचे दिवस -**

निकोला टेस्ला हा एवढा यशस्वी संशोधक होता की त्याच्या काही संकल्पना, सिद्धांत हे वैज्ञानिक व व्यवहारिक रूपाने अशक्य असूनही केवळ त्याचे नाव जोडले गेल्याने विज्ञानाचा गंधही नसलेल्या व्यक्तींचा एक आकर्षणाचा केंद्र बनला होता आणि आजही आहे. विज्ञान जगताने त्याला पुरेशा सन्मानाने गौरविले आहे. चुंबकीय प्रभावाचे एकक 'टेस्ला' हे नाव निकोला टेस्लाच्या सन्मानार्थ दिले गेले आहे.

नंतरच्या काही संशोधनामध्ये अपयश आल्याने टेस्ला उदासिनतेने ग्रासला गेला. त्यामुळे त्याने लोकांशी असलेला संपर्क पूर्णतः कमी केला. टेस्लाचे संशोधन पाहता संपूर्ण अमेरिका १० जुलै हा दिवस 'निकोला टेस्ला दिवस' (Nicola Tesla Day) म्हणून साजरा केला जातो.

अशा ह्या महान संशोधकाने ७ जानेवारी १९४३ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी न्युयॉर्कमध्ये अखेरचा श्वास घेतला.

# पाऊस आठवणीतला



पाऊस आठवणीतला
खुदुखुदु हसविणारा
खोटे खोटे पैसे देवून
मोठा मोठा येणारा

पाऊस आठवणीतला
धो-धो कोसळणारा
शाळेच्या खिडकीतून
हळूच खुलविणारा

पाऊस आठवणीतला
कागदी होडीबरोबर वाहणारा
शाळेभोवती तळे साचून
हमखास सुट्टी देणारा

पाऊस आठवणीतला
चिंबचिंब भिजविणारा
आईच्या हातच्या चहाची
लज्जत अजून वाढविणारा
आता पाऊस कसल्यासारखा वाटतो
रौद्र रूपातल्या बातम्या बनून
न्यूज चॅनलवरती आदळतो.

**- योगेश देवांग,** बी. ए. भाग ३

# माझी आई

किती मंद तो प्रकाश तुझ्या गर्भामध्ये होता
स्वर्गातला तो काळ माझ्याभोवती होता
एकटाच मी अन् माझं जग तू होतीस
या भयाण जगापासून मला तू लपवित होतीस
तुझ्या हृदयाचा आवाज किती मधुर तो होता
तुझ्या प्रत्येक श्वासावर माझा छोटा जीव होता
तुला-मला जोडणारी एक कोमल दोर आत होती
तुझी नाळ ती जणू वेल मला लपेटलेली होती
तुझा आवाज येता ओठ माझे हसायचे
कान माझे जणू तुझ्या आवाजाला तरसायचे
तू स्वतःला किती किती जपायचीस
एक मी जगावं म्हणून तू किती किती मरायचीस
जन्म मला देताना किती सोसलास तू त्रास
पण मी जगावं फक्त हाच तुझा ध्यास
गर्भातले ते महिने पुन्हा कधी येणार नाहीत
पण मी अजून ही तुझ्याशिवाय जगू शकणार नाही!

**- योगेश देवांग,** बी. ए. भाग ३

# गोड्या पाण्यातील मत्स्यशेती : शेतकऱ्यांसाठी एक वरदान (संशोधनपर लेख)

**कु. मिरजकर सुमैय्या फरदीन**, बी. एस्सी. भाग - ३

महाराष्ट्रात गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसायासाठी ३०१, ८३० हेक्टर क्षेत्राचे तलाव, जलाशय उपलब्ध आहेत. सध्या गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन २७,००० टन असून हे उत्पादन वाढविण्यास बराच वाव आहे. मासळीची शिकार करण्यापेक्षा मत्स्यशेतीचे तंत्र आत्मसात करून मासळीचे भरघोस पीक काढावे व त्यापासून अधिकाधिक उत्पन्न मिळवून स्वतःची भरभराट करून घ्यावी ही आज काळाची गरज आहे. शिकाऱ्याने शेतकरी व्हावयाचे तर त्याने त्याकरिता पाण्यातल्या शेतीचे नवीन तंत्र शिकायला हवे. अशा मत्स्यशेतीचे प्रशिक्षण मच्छीमारांना देण्याची शासनाची योजना आहे.

गोड्या पाण्याच्या साठ्यामध्ये नद्या, सरोवरे, लहान मोठे तलाव, तळी, डबकी हे नैसर्गिक साठे तसेच माणसाने मुद्दाम तयार केलेले जलाशय या सर्वांचा समावेश होतो. महाराष्ट्रात सध्या प्रचलित असलेले गोड्या पाण्यातील मासे एकतर स्थानिक जातीचे असतात. (उदा. मरळ, मागूर, शिवडा वगैरे) किंवा दुसऱ्या राज्यातून किंवा परदेशातून आयात केलेले असतात. (उदा. कटला, रोहू, मृगळ, गवत्या, चंदेरा वगैरे) या जाती मत्स्यशेतीकरता उपयुक्त आहेत.

ग्रामीण जनतेला पौष्टिक व चौरस आहार मिळावा या दृष्टीने मासळीला अन्नपदार्थात महत्वाचे स्थान आहे. मासळीच्या मांसाचे घटक प्रामुख्याने पाणी ७५ ते ८० टक्के, प्रथिने १५ -२२ टक्के व अन्य घटक ०-५ टक्के हे असतात. म्हणजेच मासळीपासून प्रथिने फार मोठ्या प्रमाणात मिळतात. मात्र मासळीमध्ये प्रथिनांचे मोठे प्रमाण एवढेच महत्वाचे नसून मासळीतील प्रथीने पचावयास सोपी असतात. मासळीतील प्रथिनांचा ९० ते ९५ टक्के भाग सुलभतेने पचतो, तर मटणाचा फक्त ६० -६५ % भागच पचायला सोपा असतो. याशिवाय मासळीत कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम लोह इत्यादी क्षार थोड्या प्रमाणात असतात. अशाप्रकारे ग्रामीण जनतेस रोजगार व पोषक अन्न मिळवून देणारा मत्स्यशेती हा व्यवसाय ग्रामीण भागाचा कायापालट घडवून आणण्यास समर्थ आहे.

गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसायाच्या बाबतीत सर्वाधिक महत्वाची गोष्ट म्हणजे मासेमारीचे हक्क मिळणे हा होय. नद्यामध्ये मासेमारी मुक्तपणे करता येते. त्यासाठी कोणताही परवाना किंवा ठेका नसतो. मात्र कोल्हापूर, नांदेड यांसारख्या काही जिल्ह्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून नदीभागाचे ठेके देण्याची पद्धत आहे. आता हे ठेके लिलावाने देण्याऐवजी मच्छीमार सहकारी संस्थांना प्राधान्याने देण्यात येतात. एवढा अपवाद वगळता अन्यत्र नदीभागात कोणासही मासेमारी करण्यास मनाई नाही. मत्स्यशेतीतील दुसरी महत्वाची बाब म्हणजे मत्स्यबीज, अलिकडे हे बीज पुरवठ्याचे काम महाराष्ट्र राज्य मच्छीमार सहकारी संघाकडे सोपविलेले आहे. संघ वाजवी किंमत आकारून सहकारी संस्थाना व इतर मत्स्यकास्तरांना बीजांचा पुरवठा करतो. मत्स्यउत्पादन वाढविण्यासाठी वेगवेगळी सेंद्रीय व रासायनिक खते वापरावी लागतात. मच्छीमारी करण्यासाठी जाळी व नावा यांची आवश्यकता असते.

गोड्या पाण्यातील मत्स्यशेती करण्यासाठी उपयोगी अशी हजारो तळी महाराष्ट्रात आहेत. बारमाही किंवा दीर्घकाळ पाणी टिकणाऱ्या बहुतेक तळ्यांचा मत्स्यशेतीसाठी वापर होऊ लागला. बऱ्याचशा ग्रामपंचायती आपल्या मालकीच्या तळ्यात मत्स्यबीज सोडतात. वाढलेले मासे पकडण्यासाठी एकतर त्या तळ्यांचा लिलाव करतात किंवा जवळच्या मच्छीमार सहकारी संस्थांना ठेक्याने देतात. या गावतळ्यातील मत्स्यशेतीमुळे शेकडो लोकांना व्यवसाय मिळाला आहे.

गोड्या पाण्यातील मत्स्यशेती करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना राष्ट्रीय सहकार विकास निगमाकडून उत्पादन, सुरक्षण, वाहतूक, विक्री, नौका बांधणी व यांत्रिकीकरण इ. मत्स्यव्यवसायाच्या बहुतेक बाबींवर अर्थसहाय्य मिळू शकते. त्यासाठी संस्थेची व प्रकल्पाची माहिती विशिष्ट नमुन्यात भरून द्यावी लागते. असा प्रकल्प तयार करणे व अर्ज भरणे या बाबी काहीश्या गुंतागुंतीच्या असल्याने त्यासाठी संबंधित मत्स्यव्यवसाय, अधिकाऱ्याचे मार्गदर्शन घ्यावे. अशा तऱ्हेचे मच्छीमार करणाऱ्या लोकांनी अल्पसंतुष्ट न राहता शासनाकडून मिळणाऱ्या सवलतींचा व योजनांचा